अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १३९ । सोमवार २ मार्च २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com




# पश्चिम आशियात युद्धाचा भडका!

## ■ इराणमध्ये लष्करी राजवट, अयातुल्ला खामेनींचे निधन
## ■ भारताच्या १४,००० कोटींच्या व्यापारावर टांगती तलवार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील भू-राजकीय समीकरणे एका रात्रीत बदलली असून संपूर्ण जग युद्धाच्या छायेखाली आले आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनानंतर तेथील शक्तिशाली 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स'ने सत्तेची सूत्रे हाती घेतली आहेत. इराणमधील या अस्थिरतेचा आणि इस्रायल-अमेरिका यांच्याशी वाढलेल्या संघर्षाचा थेट फटका भारतीय अर्थव्यवस्थेला बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भारत आणि इराणचे व्यापार संबंध खामेनींच्या काळात स्थिर होते. मात्र, आता लष्करी राजवटीमुळे भारताचा सुमारे १.६८ अब्ज डॉलर्स (१४,००० कोटी रुपये) चा व्यापार धोक्यात आला आहे. भारत मोठ्या प्रमाणावर बासमती तांदूळ, चहा, साखर आणि औषधे इराणला निर्यात करतो. इराणमधील बँकिंग प्रणालीवर निर्बंध आल्यास भारतीय निर्यातदारांचे कोट्यवधी रुपये अडकून पडण्याची दाट शक्यता आहे.



भारत आपल्या गरजेच्या ८०% तेल आयात करतो. जरी आपण इराणकडून थेट तेल घेत नसलो, तरी जागतिक तणावामुळे तेलाच्या किमतीत उसळी येण्याची भीती आहे. कच्चे तेल महागल्यास भारतात पेट्रोल-डिझेलचे दर वाढतील, ज्याचा परिणाम दूध, भाजीपाला आणि अन्नधान्याच्या वाहतुकीवर होईल. तेलासाठी अधिक डॉलर मोजावे लागल्याने भारतीय रुपया कमकुवत होईल, ज्यामुळे आयात होणाऱ्या सर्वच वस्तू महागतील.

**'ओपेक'ची मदत**

मध्य पूर्वेतील परिस्थिती गंभीर असली तरी एक सकारात्मक बाब समोर आली आहे. जागतिक बाजारात तेलाचा तुटवडा भासू नये म्हणून सौदी अरेबिया आणि रशियासह ओपेक देशांनी दररोज अतिरिक्त २,०६,००० बॅरल तेल बाजारात सोडण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे तूर्तास इंधन दर नियंत्रणात राहण्यास मदत होईल.

**स्वयंपाकघरात महागाईचा शिरकाव**

इराणमधील अस्थिरतेचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या बजेटवर होणार आहे. पिस्ता, खजूर, किवी आणि इराणमधून येणाऱ्या सफरचंदांचा पुरवठा विस्कळीत झाल्यास या वस्तूंचे दर गगनाला भिडतील. युद्धाच्या भीतीमुळे आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीचा विमा आणि खर्च वाढल्याने स्थानिक बाजारातही महागाई वाढू शकते.

**सर्वात मोठा धोका**

होर्मुझची सामुद्रधुनी जर हा समुद्री मार्ग युद्धाच्या कारणास्तव बंद झाला, तर जागतिक तेल पुरवठा कोलमडू शकतो, जो भारतासाठी सर्वात मोठा आर्थिक आपत्तीचा काळ ठरेल.

भारतासाठी महत्त्वाचे असलेले चाबहार बंदर आणि 'आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉर' या प्रकल्पांचे भविष्य आता इराणच्या नव्या लष्करी नेतृत्वाच्या धोरणांवर अवलंबून आहे. इस्रायल आणि अमेरिकेशी इराणचा संघर्ष तीव्र झाल्यास भारताला मोठी राजनैतिक कसरत करावी लागेल.

**इराणकडून हल्ले सुरू...**

अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या संयुक्त हल्लूयात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह खोमेनी यांना मारल्यानंतर इराणने आखाती देशांमधील अमेरिकन तळांवर आणि इस्रायलवर हल्ले चढवले आहेत. इराणने खोमेनी यांच्या हत्येचा बदला घेणार असल्याचे सांगत (पान ४ वर)

# २००५ नंतर अनुदानित शिक्षक व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी : उच्च न्यायालय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संभाजीनगर :** जुनी पेन्शन लागू करावी, अनेक वर्षांपासूनची शिक्षकांची मागणी असून, त्यातून काही शिक्षकांना औरंगाबाद खंडपीठाच्या एका आदेशाने दिलासा मिळाला आहे. ऑक्टोबर २००५ पूर्वी अंशतः अनुदानित नियुक्त झालेल्या आणि नंतर १०० टक्के अनुदानित विभागात कार्यरत झालेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. अरुण आर. पेडणेकर आणि न्या. वैशाली जाधव पाटील यांनी दिला आहे.

याप्रकरणी ३१ ऑक्टोबर २००५ पूर्वी विना अनुदानित तुकडीवर, टप्पा अनुदानित तुकडीवर कार्यरत आसणाऱ्या १०० टक्के अनुदानीत शाळेवरील सहाय्यक शिक्षक, कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकाकर्ते ३१ ऑक्टोबर २००५ पूर्वी अंशतः अनुदानित विभागात नियुक्त झाले होते. पुढे संबंधित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान मिळाल्यानंतरही त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली नाही. त्याऐवजी त्यांना डीसीपीएस/एनपीएस लागू करण्यात आली, जी अन्यायकारक आहे. या विरोधात छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, जालना, बीड, धाराशिव, परभणी, जळगाव येथील सहाय्यक शिक्षक, कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांनी याचिका दाखल केल्या होत्या.

राज्य शासनातर्फे सहायक सरकारी वकील ॲड ए. आर. काळे यांनी युक्तिवाद केला, तर अहिल्यानगर जिल्हा परिषदेसाठी ॲड. सुवर्णा एम. जवरे यांनी बाजू मांडली. या निर्णयामुळे राज्यातील हजारो शिक्षकांना दिलासा मिळाला असून, अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या लढ्याला यश आल्याचे मत शिक्षक संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

**न्यायालयाने सुनावणीनंतर याचिकाकर्त्यांचा दावा ग्राह्य धरत राज्य शासन व संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांना निर्देश दिले की, पात्र शिक्षक कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजनेचे लाभ देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त होऊन निवृत्त झालेल्या शिक्षकांच्या पेन्शन प्रस्तावांची प्रक्रिया निश्चित कालावधीत पूर्ण करावी, असेही आदेशात म्हटले आहे. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. माजित शेख, ॲड. महेश देशमुख यांनी ॲड. के. डी. पोटे, ॲड. अरविंद गोपाळराव अंबेटकर आदींनी बाजू मांडली.**




## महत्वाचे..

### ज्येष्ठाची दहा कोटींची फसवणूक करणारे सायबर चोरटे अटकेत

पुणे : डिजिटल अँरेस्टची भीती दाखवून शहरातील एका ज्येष्ठ नागरिकाची पावणे अकरा कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या सायबर चोरट्यांना सायबर गुन्हे शाखेने अटक केली. हर्षद सुभाष धनतोले (वय २३), समर्थ सुरेश देशमुख (वय २४, दोघे सध्या रा.कर्वेनगर, मूळ रा. छत्रपती संभाजीनगर) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत. आरोपी धनतोले, देशमुख यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधून केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागातील (सीबीआय) अधिकारी असल्याची बतावणी केली होती. काळ्या पैशांच्या व्यवहारात बँक खात्याचा वापर करण्यात आला असून, या प्रकरणात सीबीआयकडून अटक (डिजिटल अँरेस्ट) करण्यात येणार असल्याची भीती दाखविण्यात आली होती. या प्रकरणात कुटुंबीयांनाही अटक करण्यात येणार असल्याचे सांगून आरोपींनी ज्येष्ठ नागरिक आणि त्याच्या कुटुंबीयांनी तातडीने चोरट्यांनी दिलेल्या बँक खात्यात रक्कम जमा करावी, असे सांगितले. त्यानंतर ज्येष्ठ नागरिकाने चोरट्यांच्या खात्यात दहा कोटी ७४ हजार रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांनी शिवाजीनगर येथील सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.सायबर पोलिसंच्या पथकाने तपास करून आरोपी धनतोले अणि देशमुख यांना अटक केली.




# कुलस्वामिनी कला केंद्राची तोडफोड

## १० गाड्या फोडल्या, महिला थोडक्यात बचावल्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पैठण :** तालुक्यातील थापटी तांडा येथे शनिवारी रात्री सुमारे ११ वाजता एका किरकोळ वादातून सुरू झालेला प्रकार काही वेळातच भीषण हिंसाचारात बदलला. संतप्त झालेल्या सुमारे ३०० ग्रामस्थांच्या जमावाने थापटी तांडा येथील कुलस्वामिनी कला केंद्रावर चाल करत मोठ्या प्रमाणात तोडफोड केली. या घटनेमुळे पैठण तालुक्यात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून पोलिसांकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजापूर गावातील एक तरुण रस्त्याने पायी जात असताना काही मद्यधुंद व्यक्तींनी त्याला क्षुल्लक कारणावरून बेदम मारहाण केली. ही घटना गावात कळताच संतापाची लाट उसळली. काही वेळातच शेकडो ग्रामस्थ लाठ्या-काठ्या घेऊन कुलस्वामिनी कला केंद्राकडे धावले. जमाव इतका आक्रमक होता की, त्यांनी कला केंद्राचा मुख्य लोखंडी दरवाजा तोडून आत प्रवेश केला.

आत घुसल्यानंतर जमावाने अक्षरशः धुडगूस घातला. फर्निचर, टेबल, विद्युत उपकरणे, तसेच महागडे सीसीटीव्ही कॅमेरे फोडण्यात आले. पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या १० ते १२ चारचाकी वाहनांच्या काचा फोडल्या, ज्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले. या दगडफेकीत ३ ते ४ जण जखमी झाल्याची माहिती आहे. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात प्रचंड घबराट पसरली होती. या हल्ल्यावेळी कला केंद्रात उपस्थित (पान ४ वर)

# अहिल्यानगर 'ड्रग्ज' कनेक्शनचा पर्दाफाश!

## वाघोलीत २८ लाखांचे मेफेड्रोन जप्त; राजस्थानमधील तस्करांच्या मुसक्या आवळल्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**


**अहिल्यानगर :** पुणे-अहिल्यानगर महामार्गावर अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या एका मोठ्या टोळीचा वाघोली पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. अहिल्यानगर जिल्ह्याशी धागेदोरे असलेल्या या कारवाईत २८ लाख रुपयांचे मेफेड्रोन (एमडी) आणि ५५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, राजस्थानमधील दोन तस्करांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

नगर रस्त्यावरील 'केसनंद'मध्ये सापळा

नगर रस्त्यावरील केसनंद फाटा परिसरात मेफेड्रोन विक्रीसाठी एक तस्कर येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून किशन नंदकिशोर लधड (वय ३५, रा. धानोरी) याला ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीतून या तस्करीचे मुख्य केंद्र असलेल्या हनुमान रूपाराम चौधरी (वय ३३, रा. वडगाव मावळ) याचे नाव समोर आले. पोलिसांनी तातडीने वडगाव मावळ येथे धाड टाकून चौधरीलाही जेरबंद केले.

**अहिल्यानगरच्या 'ड्रग्ज' घोटाळ्याशी साधर्म्य**

अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांत समोर आलेल्या ड्रग्ज प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. अटक केलेले दोन्ही आरोपी मूळचे राजस्थानचे असून, ते थेट राजस्थानातून ड्रग्ज आणून पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात त्याचे वितरण करत होते.



**जप्त मुद्देमाल: १३४ ग्रॅम मेफेड्रोन (किंमत २८ लाख रुपये), आलिशान कार आणि मोबाईल असा एकूण ५५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**कारवाईचे स्वरूप: हे आरोपी मागील वर्षभरापासून या परिसरात सक्रिय असल्याची धक्कादायक माहिती तपासात समोर आली आहे.**

अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त सोमय मुंडे आणि सहायक आयुक्त नूतन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड व त्यांच्या पथकाने ही धडाकेबाज कामगिरी केली.

जिल्ह्यावर 'ड्रग्ज'चे सावट: अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून अमली पदार्थांच्या तस्करीचे अनेक मोठे घोटाळे उघडकीस येत आहेत. वाघोलीतील या कारवाईमुळे या तस्करीचे जाळे आंतरराज्य स्तरावर पसरल्याचे स्पष्ट झाले असून, आता पोलीस या टोळीच्या स्थानिक हस्तकांचा शोध घेत आहेत.

# दुबई विमानतळावर अहिल्यानगरचे नागरिक अडकले

## विमानसेवा ठप्प झाल्याने परतीचा मार्ग रोखला

**अहिल्यानगर :** इराण आणि इस्रायल यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीमुळे आखाती देशांमधील हवाई क्षेत्र तात्पुरते बंद करण्यात आले आहे. याचा मोठा फटका पर्यटनासाठी आणि कामानिमित्त दुबईला गेलेल्या भारतीयांना बसला असून, यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक पर्यटकांचा समावेश आहे. विमान उड्डाणे रद्द झाल्याने हे नागरिक दुबई विमानतळावर आणि शहरात अडकून पडले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अहिल्यानगरसह धुळे, पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक नागरिक गेल्या काही दिवसांपासून दुबईच्या सहलीवर होते. रविवारी (१ मार्च २०२६) त्यांची परतीची विमाने नियोजित होती. मात्र, इराणने केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांनंतर सुरक्षेच्या कारणास्तव दुबई विमानतळ काही काळासाठी बंद करण्यात आले आणि सर्व आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली. यामुळे शेकडो प्रवासी विमानतळावरच अडकले आहेत.

अहिल्यानगरच्या नागरिकांची स्थिती

अहिल्यानगर जिल्ह्यातील अडकलेल्या नागरिकांनी सोशल मीडिया आणि फोनद्वारे आपल्या कुटुंबीयांशी संपर्क साधला असून, ते सर्व सुरक्षित असल्याचे समजते. मात्र, विमानतळावर मोठी गर्दी आणि विमानांच्या अनिश्चिततेमुळे (पान ४ वर)

# काटोलमध्ये स्फोटके बनवणाऱ्या कंपनीत भीषण स्फोट

## १५ कामगारांचा मृत्यू, २० जण जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नागपूर :** जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील राऊळगाव येथून एक अतिशय मोठी बातमी समोर आली आहे. राऊळगाव येथे असलेल्या एसबीएल कंपनीत सकाळी ७ वाजताच सुमारास मोठा स्फोट झाला. बारुद आणि त्यापासून डेटोनेटरसह इतर स्फोटक बनवणाऱ्या कंपनीत हा मोठा स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान या भीषण स्फोटात १५ कामगारांचा मृत्यू झाला तर २० जण जखमी झाले.

या भीषण स्फोटानंतर परिसरात मोठा आवाज होऊन एकच खळबळ उडालीय. तर या भीषण स्फोटात जखमी कामगारांना जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तर मोठ्या प्रमाणात झालेल्या स्फोटनंतर परिसरात आगही लागली आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्नीशामक विभागाकडून बचावकार्य सुरु करण्यात आलं आहे. दुसरीकडे परिसरात मृतकांच्या नातेवाईकांनी परिसरात मोठी गर्दी केल्याचे पाहायला मिळत आहे.

नागरिकांमध्ये मोठा रोष उसळल्याचेही चित्र आता बघायला मिळत आहे. एसबीएल कंपनीत सकाळी ७ वाजताच सुमारास हा स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र या स्फोटाचे नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

**दरम्यान, या स्फोटाच्या अपघातावर काटोलचे आमदार चरणसिंग ठाकूर यांनी १५ मृत्यू आणि २० जखमी झाले असल्याचे सांगितले आहे. या ठिकाणी कंपनीकडून सुरक्षितते बद्दल मोठं दुर्लक्ष असल्याचा आरोप त्यांनी केलाय. प्रशिक्षणा शिवाय आणि कुठलीही आवश्यक ती काळजी न घेता काम गार वापरले जातात, असा त्यांचा आरोप आहे.**

# सिंहस्थासाठी पोलिसांना मिळणार १० हजार स्वयंसेवक, होमगाड्सची साथ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यात देश-विदेशातून येणाऱ्या कोट्यवधी भाविकांच्या सुरक्षिततेला शासन-प्रशासनाकडून प्राधान्य देण्यात येत आहे. प्रमुख अमृत स्नान व पर्वणींना होणारी गर्दी लक्षात घेत सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणातर्फे भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिसांच्या मदतीला होमगाड्र्स, दहा हजार स्वयंसेवक तैनात करण्यात येणार आहेत.

प्रयागराजच्या महाकुंभमेळ्यात मोठ्या प्रमाणात भाविकांनी गर्दी केली. त्यामुळे महाकुंभमेळ्याचा अनुभव पाहता नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्यात गर्दी नवा उच्चांक गाठेल, असा अंदाज आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भाविकांची



सुरक्षितता, नदीघाटांची क्षमता आणि गर्दीचे नियोजन अशा तिन्ही आघाड्यांवर कुंभमेळा प्राधिकरण कार्यरत आहे. त्यातून कुंभमेळा सुरळीत, सुनियोजित व निर्विघ्न पार पाडताना येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाकडून सूक्ष्म तयारी केली जात आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्यातील प्रमुख तीन अमृतस्नानांना एक कोटी भाविक हजेरी लावतील, असा प्रशासनाचा अंदाज आहे. त्यामुळे या कालावधीत अनुचित प्रकार टाळण्यासह वाहतूक नियोजनासाठी जिल्ह्यातील पोलिसांच्या मदतीला अन्य जिल्ह्यांतील पोलिस तैनात करण्यात येणार आहेत. मात्र, संभाव्य गर्दीचा विचार करता पोलिसांच्या मदतीला गृहरक्षक दल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाचे ५०० आपदा मित्र, तसेच १० हजार स्वयंसेवक तैनात करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे.

त्यासाठी शैक्षणिक व स्वयंसेवी संस्था, युवा गट आणि नोंदणीकृत संस्थांद्वारे स्वयंसेवकांना एकत्रित करण्यात येईल. स्वयंसेवकांची किमान सेवा वचनबद्धता २५-३० दिवसांची असेल. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने या स्वयंसेवक विद्यार्थ्यांना अतिरिक्त दोन टक्के गुण (क्रेडिट पॉइंट्स) देण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, प्रशिक्षित स्वयंसेवकांच्या माध्यमातून यात्रेकरूंच्या सोयी सुधारण्यासाठी शिस्तबद्ध, प्रशिक्षित व स्थानिकस्तरावर रुजलेली समर्थन प्रणाली तयार करण्यासाठी प्राधिकरण प्रयत्नशील आहे. सुरक्षेसाठी यांची मदत पोलिस, गृहरक्षक दल, नागरी संरक्षण दल, एनडीआरएफ, एसडीआरएफ, आपदा मित्र.

कुंभमेळ्यातील प्रशिक्षणासाठी मास्टर ट्रेनर्सची निवड केली जाईल. ट्रेनर्समार्फत गर्दी व्यवस्थापन आणि आपत्कालीन प्रतिसाद (पान ४ वर)

**प्रशिक्षण मॉडेल**

**सिंहस्थातील स्वयंसेवकांसाठी वर्तणुकीय प्रशिक्षण, गर्दीचे मानसशास्त्र, आपत्कालीन प्रतिसाद प्रोटोकॉल, संवाद कौशल्ये, सांस्कृतिक संवेदनशीलता आणि पर्यटन जागरूकता यांचा समावेश असलेले एक संरचित प्रशिक्षण मॉड्यूल तयार करण्यात येईल. स्वयंसेवकांना अमृतस्नानाच्या दिवसांच्या व्यवस्थापनासह दिशा निर्देश आणि माहिती समर्थनासाठी मदत करण्यासाठी, हरवलेल्या व सापडलेल्या परिस्थितीत समन्वय साधण्यासाठी आणि देखरेखीखाली मूलभूत प्रथम प्रतिसाद समर्थन प्रदान करण्यासाठीचे मार्गदर्शन केले जाईल.**

# संपादकीय

## विवाह स्वातंत्र्य आणि पालकांचा 'खोडा'

भारतीय विवाह संस्था सध्या एका विचित्र वळणावर उभी आहे. एकीकडे आधुनिक पिढी वैयक्तिक स्वातंत्र्याचा संकोच करणाऱ्या जुनाट बेड्या तोडू पाहत आहे, तर दुसरीकडे पालकांचा आणि समाजाचा वाढता हस्तक्षेप या स्वातंत्र्याला वेसण घालू पाहत आहे.

गुजरात सरकारने नुकतीच केलेली घोषणा ज्यामध्ये प्रेमविवाहासाठी पालकांची संमती अनिवार्य करण्याची कायद्यात दुरुस्ती करण्याचे संकेत दिले आहेतही केवळ एका राज्यापुरती मर्यादित बाब नाही, तर ती संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांवरील गदा ठरण्याची शक्यता आहे.

भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद २१ प्रत्येक सज्ञान व्यक्तीला स्वतःचा जोडीदार निवडण्याचा अधिकार देते. सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी हे स्पष्ट केले आहे की, दोन सज्ञान व्यक्तींच्या वैयक्तिक निर्णयात राज्यसंस्था किंवा कुटुंब हस्तक्षेप करू शकत नाही. मात्र, गुजरातमध्ये प्रबळ पाटीदार समाजाच्या मागणीला दिलेला राजकीय प्रतिसाद हा लोकशाहीतील 'व्यक्ती'पेक्षा 'समूहाच्या' मताला दिलेले महत्त्व अधोरेखित करतो. या मागणीच्या मुळाशी 'लव्ह जिहाद'ची भीती किंवा मालमत्ता समाजाबाहेर जाण्याची चिंता असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात हा प्रकार तरुण–तरुणींच्या स्वेच्छेवर घातलेला घाला आहे.

उत्तराखंडने 'लिव्ह–इन रिलेशनशिप'च्या नोंदणीसाठी पालकांची संमती अनिवार्य केल्यानंतर, आता गुजरातने पाऊल उचलले आहे. विशेष म्हणजे, तिथले सत्ताधारी आणि विरोधी पक्ष या मुद्द्यावर एकसुरात बोलत आहेत, कारण यामागे 'व्होट बँक' आणि राजकीय दबावाचे गणित आहे. परंतु, कायद्याचा हा बडगा केवळ एका समुदायापुरता मर्यादित राहत नाही. अशा विचारांची लाट शेजारधर्मातून महाराष्ट्रासारख्या राज्यांतही येण्यास वेळ लागणार नाही. महाराष्ट्रातही यापूर्वी अशा प्रकारच्या समित्या नेमण्याचे प्रयत्न झाले आहेत, जे आकडेवारी अभावी तर्कावर टिकू शकले नाहीत.

मुळात, आपल्या मुलीची निवड चुकीचीच असेल, असा अविश्वास पालक का बाळगतात? प्रेम ही एक नैसर्गिक भावना आहे आणि ती कोणाची 'परवानगी' घेऊन फुलत नाही. जर तरुण–तरुणींना योग्य निवडीचे शिक्षण देण्याऐवजी आपण त्यांच्यावर कायद्याचे बंधन लादणार असू, तर आपण प्रगतीशील समाज म्हणून अपयशी ठरत आहोत. ज्या 'विशेष विवाह कायद्या'ने दोन भिन्नधर्मीय किंवा भिन्नजातीय व्यक्तींना अडथळ्यांविना एकत्र येण्याची संधी दिली, त्या कायद्याच्या मूळ भावनेलाच हरताळ फासण्याचे हे प्रयत्न आहेत.

विवाह म्हणजे केवळ दोन कुटुंबांचे किंवा दोन समूहांचे मिलन नसून, ते दोन जीवांचे एकत्र येणे असते. तिथे जात, धर्म, प्रतिष्ठा आणि दंडाची भीती आणणे म्हणजे नात्यातील ओलावा संपवण्यासारखे आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी 'भारतीय विवाह संस्थेचा इतिहास' या ग्रंथात मांडल्याप्रमाणे, आपली विवाह संस्था अनेक स्थित्यंतरे पचवत इथवर आली आहे. आजच्या काळात तिला पुन्हा 'पालकांच्या संमतीच्या' कचाट्यात पकडणे हे प्रतिगामी पाऊल ठरेल. पालकांनी मुलांच्या हक्कावर गदा आणण्यापेक्षा, त्यांच्याशी संवाद वाढवून त्यांना प्रगल्भ बनवणे हाच समाजासाठी योग्य मार्ग ठरेल. अन्यथा, कायद्याचा हा 'खोडा' केवळ संघर्ष आणि सामाजिक अस्वस्थता वाढवणारा ठरेल.

## मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** महाराष्ट्र साहित्य परिषद सासवड शाखा व सासवड नगरपालिका शिक्षण मंडळ संचलित वीर बाजी पासलकर विद्यालय, शाळा क्रमांक १ येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मान्यवरांचा श्रीफळ व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव करण्यात आला. कविवर्य अनिल कदम यांनी विद्यार्थ्यांना मनोरंजनपर कथा सांगत स्वलिखित 'समेवर येताना' या काव्यसंग्रहातील कविता सादर केल्या व पुस्तक शाळेला भेट दिले. अध्यक्ष बाळासाहेब मुळीक, कार्याध्यक्ष सतीश पाटील, प्रमुख पाहुणे केशव काकडे, ज्येष्ठ साहित्यिक सुरेश कोडीतकर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक तुकाराम मुळीक यांनी मराठी भाषेचे महत्व व जागतिक अभिजात दर्जाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच सतीश पाटील यांनी कुसुमाग्रज लिखित 'नटसम्राट' व 'विशाखा' ही पुस्तके मुख्याध्यापिका माधुरी मुळीक यांना भेट दिली. विद्यार्थ्यांची प्रभात फेरी, ग्रंथदिंडी तसेच चित्र व कवितांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. द्विभाषिक विद्यार्थ्यांनी मराठीत प्रभावी भाषणे सादर केली. कार्यक्रमास पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका माधुरी मुळीक यांनी केले, तर सूत्रसंचालन संजीव कांबळे यांनी केले.




# लोणीची शाळा आदर्श व्हावी यासाठी प्रयत्न करा : शालिनीताई विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** प्रवरेचा विद्यार्थी हा शिक्षणासोबतच सर्व क्षेत्रात आघाडीवर राहावा यासाठी संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम सुरू आहेत. पालकांनी प्रवरा शैक्षणिक संकुलात आपल्या मुलाचा प्रवेश घेतल्यानंतर त्याच्या करिअरची चिंता न करता त्याला प्रोत्साहन देण्याबरोबरच शालेय उपक्रमामध्ये सहभागी व्हावे. शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यातूनच सक्षम विद्यार्थी घडणार आहे. शालेय शिक्षणाबरोबरच खेळालाही प्राधान्य देण्याचे काम प्रवरेच्या माध्यमातून होत आहे. निरोगी आरोग्यासाठी मुलांनी मैदानी खेळ खेळावेत असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी केले.



लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी बुद्रुक येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर प्राथमिक, माध्यमिक विद्यालयातील शालेय क्रीडा स्पर्धेनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे, लोणीच्या सरपंच कल्पनाताई मैड, ज्येष्ठ कार्यकर्ते किसनराव विखे, एन डी विखे, लक्ष्मण बनसोडे, भाऊसाहेब विखे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, शिक्षण संचालिका लीलावती सरोदे, डॉ. महेश खर्डे,विखे पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. ए. पवार, विद्यालयाचे प्राचार्य सुभाष कडू आदींसह पालक शिक्षक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना विखे म्हणाल्या, करिअर निवडीसाठी प्रवरा ही कायमच आपल्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. पालकांनी आपल्या मुलांना मोबाईल पासून दूर ठेवत असतानाच त्यांना खेळाची आवड निर्माण व्हावी यासाठी प्रयत्नशील राहावे. शाळेच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावे आणि यासाठी पालकांसह ग्रामस्थांचेही योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

डॉ.सुस्मिता विखे म्हणाल्या, लोणी बुद्रुकची शाळा ही आगळी वेगळी ठरावी आणि या शाळेच्या माध्यमातून राज्यांमध्ये आदर्श निर्माण व्हावा. विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच विविध करिअर मार्गदर्शन, खेळ विविध विविध शिष्यवृत्ती या माध्यमातून विद्यार्थी गुणवत्तेत पुढे जाण्यासाठी प्रयत्न होणार आहेत यासाठी पालकांनी देखील आपले योगदान द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली .यावेळी खो –खो , कबड्डी हॉलीबॉल, भाळाफेक,उंच,लांब उडी गोळा फेक अशा विविध मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या.

# राहुरीत वंचीत आघाडीमध्ये युवा कार्यकर्त्यांचा प्रवेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** आगामी येणाऱ्या सर्व निवडणुकी वंचित बहुजन आघाडी स्वबळावर लढणार असुन कार्यकर्त्यांनी सक्रिय होऊन तळागाळापर्यंत पक्षाची ध्येयधोरणे राबविण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राहुरी तालुका अध्यक्ष बाळासाहेब जाधव यांनी केले

राहुरी नगर पाथर्डी विधानसभा पोटनिवडणूक तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राहुरी शहरातील जेष्ठ नागरिक हॉलमध्ये दिनांक २८ फेब्रुवारी रोजी नवनिर्वाचित पदाधिकारीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या वेळी तालुक्यातील अनेक पक्षातील युवा पदाधिकारी यांनी वंचित बहुजन आघाडीत जाहीर पक्ष प्रवेश केला

या वेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष नगरसेवक संतोषभाऊ चोळके महासचिव मधुकर साळवे जिल्हा संपर्कप्रमुख पिंटू नाना साळवे एकलव्य संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल जाधव आदींनी मनोगत व्यक्त केले आगामी निवडणुकांसाठीची रणनीती, संघटन रचना बळकटीकरण, तसेच नवीन पदाधिकारी निवडीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्षाचे स्थानिक तसेच जिल्हा पातळीवरील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून निवडणूक तयारीला गती देण्याचा निर्धार व्यक्त केला. या बैठकीत वंचित बहुजन आघाडीचा राहुरी शहर अध्यक्षपदी ऋषिकेश गौतम साळवे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली या वेळी साहिल जाधव, संतोष पवार, शातवन साळवे, पंकज पडघलमल, नागेश जाधव, संदिप कोकाटे, बाबा शेख, राजु पोपळघट, अशोक आहेर, सुभाष भांबळ आदी उपस्थित होते



# पारदर्शकतेसाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढवणार - आ. आशुतोष काळे

## कर्मवीर काळे सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाची सांगता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** –सहकारी साखर कारखानदारीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याने पाऊल उचलले आहे. उस उत्पादक शेतकरी एआय तंत्रज्ञानाचा वापर करून उसाची नोंद हि स्वतः करू शकतील त्याचं बरोबर कारखान्याच्या वतीने मोबाईल ॲप तयार केलेले असून यातून शेतकऱ्यांना स्वतःच्या उसाची नोंद, उसाचे टनेज, उस पेमेंट व सवलतीची साखर इ. माहिती हि घरबसल्या समजणार आहे. कारखान्याच्या कामकाजात एआयचा वापर करून कामकाज अत्याधुनिक आणि सोपे कसे होईल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आ. आशुतोष काळे यांनी सांगितले.

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या २०२४/२५ च्या ७० व्या गळीत हंगामाची सांगता कारखान्याचे मार्गदर्शक व ज्येष्ठ संचालक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रवीण शिंदे व गौरीताई शिंदे यांच्या शुभहस्ते श्री सत्यनारायण महापूजा करण्यात आली. याप्रसंगी आ.आशुतोष काळे बोलत होते.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, स्वर्गीय शंकरराव काळे साहेव व स्वर्गीय शंकरराव कोल्हे साहेब यांनी साठ सत्तर वर्ष जोपासलेली कारखानदारी सुदृढ व सक्षम रित्या चालवण्यासाठी आपल्या सगळ्यांच्या सहकार्याची व प्रयत्नांची गरज आहे.

# नपावाडीत कौटुंबिक हिंसाचारा संदर्भात जनजागृती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहाता :** आपल्या आजूबाजूला व गाव खेड्यामध्ये समाजात कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनेमध्ये चिंताजनक वाढ झाली आहे. अनेक महिला शारीरिक मानसिक त्रासाचा सामना करत आहे. या घटना थांबवण्यासाठी जनजागृतीची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन ग्रामपंचायत अधिकारी एस व्ही कोतकर यांनी केले.

पोलीस स्टेशन व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आदिशक्ती अभियानात महिलांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळीसरपंच पल्लवी इले यांनी केले. यावेळी राहता पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी ,उपसरपंच दीपक वहाडणे , तंटामुक्त समितीचे अध्यक्ष, पोलीस पाटील ोगिनी धनवटे, राजेंद्र धनवटे ,रामनाथ वहाडणे, संदीप बनकर अदी सह महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने पस्थित होते.यावेळी पुढे बोलताना त्या म्हणाल्या की महिलांना कायद्याने सक्षम केले असून भीती न बाळगता पुढे आले पाहिजे. अत्याचार झाल्यास आपल्या जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली पाहिजे. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५



अंतर्गत महिलांना हिंसामुक्त घरात राहण्याचा अधिकार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अनेक महिलांनी ग्रामपंचायतीने घेतलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. गावात अशा घटना घडल्यास नको म्हणून यावेळी शपथ घेण्यात आली. उपसरपंच दिपक वहाडणे यांनी मानले.

# सावरगाव तळ प्रवराचे एनएमएमएस परीक्षेत १४ विद्यार्थी उत्तीर्ण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** तालुक्यातील सावरगाव तळ येथील प्रवरा शिक्षण संस्थेचे प्रवरा माध्यमिक विद्यालयातील१४ विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्य वृत्ती परीक्षा (एन.एम.एम.एस.) मध्ये उत्तीर्ण होऊन शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपल्या गावाचा ठसा उमटविला आहे.

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक एम एम एन एस ही शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा व शैक्षणिक गुणवत्तेचा कस पाहणारी महत्त्वाची परीक्षा मानली जाते. या परीक्षेत यश मिळविणार्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास जिद्द आणि शिक्षक मार्गदर्शनाच्या बळावर हे यश मिळविले आहे. एन. एम.एम.एस. या राज्यस्तरीय




स्पर्धात्मक परीक्षेत विद्यालयातील रागिनी गणेश खैरे, साहिल अशोक नेहे, सानिका राजेंद्र गुळवे, ऐश्वर्या शिवाजी शेळके, जीवन रामनाथ गुळवे, अजय अनिल गांडाळ, अक्षदा गोरक्षनाथ थिटमे, अंतरा संतोष वाघमारे, प्राची सतीश वाल्हेकर, आराध्या राहुल नेहे, सृष्टी प्रविण नेहे, ऋतिका बाबासाहेब नेहे, युवराज सुधाकर नेहे आणि सुयोग राजेंद्र नेहे यांचा समावेश आहे.

विद्यालयातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन, सराव चाचण्या व वैयक्तिक लक्ष देऊन त्या विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली गेली . त्यामुळेच हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे त्यांच्या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शक शिक्षकांचे तसेच पालकांचे अभिनंदन होत आहे. विद्यालयाच्या या यशामुळे सावरगाव तळ आणि तालुक्याच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून भविष्यात ही असेच यश संपादन करण्याचा विद्यालयाने निर्धार करावा अशी अपेक्षा व्यक्त केली

# संत तुकाराम महाराज मंदिरातील श्रीमद भागवत कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** येथे जगद्गुरू संत तुकाराम महाराज सदेह वैकुंठगमन सोहळयाच्या निमित्ताने गुरुवर्य महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संत तुकाराम महाराज मंदिर प्रांगणात भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप यांच्या सुश्राव्य वाणीतून आयोजित श्रीमद भागवत कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

नेवासा येथील संत तुकाराम महाराज मंदिर प्रांगणात बिजोत्सवाच्या निमित्ताने श्रीमद भागवत कथा सुरू आहे. यावेळी बोलताना भागवताचार्य हभप अंकुश महाराज जगताप म्हणाले की भागवत कथा श्रवणाने मनुष्य जीवाचा उद्धार होतो, भागवत कथा म्हणजे भगवान श्रीकृष्ण परमात्म्याचेच चरित्र आहे. परमार्थ हे सर्वात श्रेष्ठ धन असून मनुष्य जिवाच्या कल्याणाचे साधन



असल्याचे त्यांनी यावेळी बोलतांना सांगितले अन्नदान करणाऱ्या दात्यांसह सेवेकरी बी.के. काळे, बी.के.पवार, डॉ. मुरलीधर कराळे, कमलताई कराळे, रामराव बोरुडे, अँड. काकासाहेब गायके, भाऊसाहेब नवले, निखिल राऊत, श्वेता राऊत, नंदाताई शिंदे, माजी सरपंच सतीश गायके, आदर्श शिक्षिका सुनीता कर्जुले–राऊत यांच्या हस्ते भागवत कथेची आरती करण्यात आली. कथेप्रसंगी उपस्थित हजारो भाविकांना फराळ प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# भांडण वाढवू नको म्हटल्याचा राग; महिलेला मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** गावचे पोलीस पाटील घरी येऊन भांडण मिटवून गेले आहेत, तु आता भांडण वाढवू नको, असे म्हणाल्याचा राग आल्याने सुनिता हारदे यांना सासू, भाचा व नणंदेने शिवीगाळ करुन दगड व लाथा बूक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दि. २६ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास घडली आहे. सुनिता शिवनाथ हारदे, वय ३५ वर्षे, ह्या त्यांच्या कुटूंबासह राहुरी तालुक्यातील तुळापुर येथे राहत असून शेजारीच त्यांची सासू जनाबाई व सासुरे वेनूनाथ हे राहवयास आहेत. दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास सुनंदा हारदे ह्या त्यांच्या घरी असताना आरोपी घरासमोर आले.तेव्हा किरण औताडे हा म्हणाला कि, काल तु माझ्या आजीला काय म्हणाली होती? त्यावेळी सुनंदा हारदे म्हणाल्या कि, आज सकाळी आपल्या गावचे पोलीस पाटील बाळकृष्ण हारदे यांनी घरी घेवून भांडण मिटून गेले आहेत. तु आता भांडण वाढू नको. तेव्हा आरोपींनी सुनंदा हारदे यांना शिवीगाळ करुन दगड व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. सुनिता शिवनाथ हारदे यांच्या फिर्यादीवरून आरोपी जनाबाई वेनूनाथ हारदे, रा. तुळापुर, ता. राहुरी, आणि किरण गोरक्ष औताडे, शोभा गोक्षनाथ औताडे, दोघे रा. माळेवाडी, ता. श्रीरामपुर, या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

**रमजानुल मुबारक २०२६**
**रोजा नंबर १०**

# विश्वाचा निर्माता (अल्लाह – परमेश्वर )कौंन – कसा ?

दिव्य कुरआनात अल्लाह म्हणतात, '' कोणी निर्माण केल्याशिवाय ते अस्तित्वात आलेले आहेत की काय ? की, त्यांनी स्वतःला निर्माण केलें आहे. ( सुरहा नं. ५२ अत – तुर, आ नं. ३५).

दिव्य कुरआन नुसार ,'' ज्याने मला जन्म दिला आहे , तोच ही मला सरळ मार्ग दाखवतो तोच मला अन्न–पाणी देतो , आणि मी आजारी पडलो तर ; तोच मला बरा करतो , तोच मला मृत्यू देईल आणि हो , मग पुन्हा तोच मला कयामतच्या दिवशी जिवंत करील आणि ज्यांच्यापासून मी आशा बाळगतो की , तोच ( कयामतच ) च्या मोबदल्याच्या दिवशी माझी चुक माफ करील ,'' (दिव्य कुराण , सुराह नं.२६ , अल–अशुराह आ.नं .७८, ७९, ८० , ८१, ८२ ).

'' तोच सृष्टीचा निर्माता – रब ( पालनकर्ता ) आहे .'' ( सुराह नं.१ अल –फातिहा आ.नं.१,२ ).

'' तोच चिरंतरजीवी असून , तमाम सृष्टीचा भार त्यानेच सांभाळलेला आहे , पृथ्वी व आकाशाचा स्वामी ( रब ) तोच आहे '' ( सुराह नं.२ आ.नं.२५९ ).

'' समस्त सृष्टीचा स्वामी ( रब) तोच आहे , प्रतिष्ठा प्राप्त करणारा ही तोच (रब) आहे व अपमानित करणारा ही तोच आहे '' ( सुराह नं.३ आ.नं.२६ – २७ ).

'' आकाशातील चंद्र –सुर्य – तारे सर्व काही त्याचेच आहे , आणि तोच जीवन व मृत्यू देणारा आहे ''( सुराह नं.१०, आ.नं.५५ – ५६ ).

'' पृथ्वी व आकाशातील गुप्त सत्यांचे ज्ञान फक्त त्यालाच आहे ,तो सर्व ज्ञानी आहे ,तो सर्व काही करु शकतो ''( सुराह नं. १६,आ.नं. ७७ )

'' सृष्टीच्या प्रत्येक वस्तूला तिचे स्वरूप प्रदान करणारा व तिला मार्ग दाखविणारा तोच आहे ''. (सुराह नं.२०,आ.नं.५०).

'' चिरंजीवी व चिरस्थानी फक्त्त तोच आहे .'' ( सुराह नं. २० आ.नं.११०–१११).

''तोच सर्वत्र सर्वोत्तम उपजिविका देणारा आहे ,'' ( सुराह नं. २२ आ.नं.५८ व ६६ ).

'' तोच असण्याला नष्ट करतो , सत्याला खरे करून दाखवतो , लोकांची निराशा झाल्यानंतर ही पाउस पाडतो '' ( सुराह नं..४२ आ.नं.२४ व ३१).

'' तोच जबरदस्त व बुद्धीमान आहे , तोच आद्य ही आहेत व अंतिम ही तोच राहाणार आहे , तोच प्रकट ही आहे व तोच अप्रकटही , व. तोच मनातील रहस्ये ही जाणणारा ,''( सुराह नं.५७ आ.नं.१ ते ६).

''तोच वाली व दाता आहे , तोच मृतांना जिवंत करणारा (कयामतच्या दिवशी) आहेत .'' (सुराह नं.४२ आ.नं.९ ).

'' तोच क्षमा करणारा ही आहे व कठोरातील कठोर शिक्षा देणारा ही तोच आहे .'' ( सुराह नं.१३ आ.नं.६).

'' तरी ही तो – निरपेक्ष आहे , कोणीही त्याची संतती नाही व तो ही कुणाची संतती नाही .'' पारा नं ३० सु.नं ११२ सुराह –ईखलास आ.नं.१ ते ४).

हीं सर्व दिव्य कुरआनातीलाच –आयाती –सुरहा उदाहरणासाठी दिलेली.. असें हजारो उदाहरण देता येतील.

सृष्टी वर तारकीक लक्ष दिले तर , निश्चितच आश्चर्यचकित झाल्या सारखं होतो.. सृष्टीतील प्रत्येक कण न कण , चंद्र –सुर्य – तारे , प्रत्येक घटना आपल्याला आश्चर्य चकीत , चमत्कारिक, अदभुत करुन सोडतात . सृष्टीच्या निर्मितीचा व सृष्टी चा सुनियोजित आराखडा ,रचना , पद्धती, त्यांची प्रत्येक क्षणा क्षणाची वेळेची अचुकता , आप–आपल्या ठराविक वेळी ; त्यामधे मिलीसेकंद पेक्षा हीं मिली सेकंदाचा ही फरक नाहीं, एवढी अचुकता , चंद्र –सुर्य –तारे – पृथ्वी यांच्या मधे एक मिली सेंकदाचाही फरक न होता आपल्या वेळेनुसार ऋतूचक्र – कालचक्र फिरत आहेत .

लाखों च्या संख्येने आकाश गंगा ( गॅलॅक्ससी,) आहेत , त्यात फक्त्त बोटावर मोजण्या इतक्याचं विज्ञानाने शोधून काढल्या.. त्यामध्ये काही ठिकाणी दिव्य कुरानात म्हटलेत जीव सृष्टी आहेत. ते शोध अजूनही विज्ञानाला लागलेला नाहीत.. परंतु १५०० वर्षा पूर्वी दिव्य कुरआन सांगून गेले.

अदभुत– अदुतिय चमत्कार आज विज्ञानाच्या युगात सुद्धा आपण आश्चर्यचकीत होऊन पहात असतो. जगात एवढ्या मोठ्या जनसंख्येला वेळेवर तीन वेळा पोटात अन्न , वेळेवरच पोहचत कसं असेल..

समुद्रात दिव्य कुरआन नुसार जवळपास १८००० आठरा हजार पेक्षा ही जास्त जिव व जंतु आहेत ( कुरआननें १५०० वर्षा पूर्वी सायंन्स डेव्हलोप नसताना सांगितले ) फक्त समुद्रात . उदाहरण फक्त्त एकटा व्हेल माश्याच घेऊ, एका वेळी एक व्हेल मासा कितीतरी टन अन्न आपल्या पोटात घेतोय ,टन एका वेळेस खातो, पुन्हा दिवसात किती खात असेल फक्त एक व्हेल मासा . असे लाखों च्या संख्येने व्हेल मासे असतील तर त्यांचं हीं आदरनिर्वाह व्यवस्थित न चुकता सर्व पूर्तता होत असते, पुन्हा अनेक कोटींनी जिव व जंतु महाकाय विशाल व्हेल माशा पेक्षा हीं अति विशाल प्राणी जिवंत त्या सप्त महासागरात आहेत.त्याच प्रमाणे जिवंत पृथ्वीवर आहेत . त्यामध्ये प्रत्येकाच्या गरजा वेगवेगळे , नखरे वेगवेगळे असून तो सर्वांचे नखरे नुखरे त्यांच्या सवयी प्रमाणे पुर्णपणे ओळखून त्यांना त्यांच्याच प्रमाणे अन्नधान्य व्यवस्थित पुरवतो . एक हजार फुटावर बारीक किडूक असतात, मुंग्या चे वारूळ असतं यांना हजार फुटावर हीं अन्न पुरवतोय..हें सर्व सिस्टिम बघून माणूस हैरान होत असतो . पण सृष्टीच्या प्रत्येक जिवजंतु , प्राणी मात्रा , प्रत्येक आणुवरेणूंची साचेबद्ध रचना बनवली आहे ,ह प्रत्येक गोष्ट शिस्तबद्ध असून साचेबद्ध काम करीत आहे, एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की प्रत्येकाला स्वतःची स्व– ओळख देऊन जन्माला घातलं आहे , प्रत्येक जिवाला एक आपलं वैयक्तिक पातळीवर विशिष्ट वैशिष्ट्य बाहल केलेलं आहे .

प्रत्येक जीवजंतू जन्माला येतात तर आईच्या गर्भात वाढणाऱ्या बाळाला तो जन्माला येण्याआधी त्याला उपाशी पोटी राहु नाही म्हणून येण्याआधीच दुधाची सोय पुर्ण करुन च जन्माला घालतोय. किती अद्भूत आहे हे , त्याच बाळाला थोडं थोडं मोठं करतो आई –बाबा व समाजाच्या प्रत्येक घटकांकडून काही तरी शिकायला देतो.

जमीनीतुन एक दान्याच्या पेरणी केल्यानंतर त्या दाण्याचे रूपांतर असंख्य ( कणीस ) करून ते धान्य , प्रत्येक दाण्यांवर त्या खाणाऱ्यांचं नाव अदृष्य ठेवून बरोबर त्याच खाणाऱ्यां जवळ पोहच करुन प्रत्येकाला त्याच्या भुकेच्या वेळेनुसार पोटात घालतो . किती अद्भुत आहे ना ? विचार केला तर आश्चर्य करण्याशिवाय पर्याय नाहीच नाही.

५०,६०,७०,८०–१०० वर्ष जगून जग सोडून एक दिवस जाने आहेत , सृष्टीच्या प्रत्येक कणा – कणाला मरण हे निश्चित ,

दिव्य कुरआन म्हणतो ''कुल्यु नफसून जायकतुल मौत '' चराचराला मृत्यू हे अंतिम सत्य आहे . हो मृत्युनंतर तो तुम्हाला अल्लाह जीवंत सुद्धा करणार आहे ( दिव्य कुरआन मध्ये अल्लाह सांगतात ) हे सुद्धा सत्य आहे . परलौकिक जीवन म्हणतात त्याला. ते जीवन लाखों वर्षाचं आहेत अल्लाह कुर आन मध्ये सांगतात.याचं उदाहरण दिव्य कुरआन मध्ये १५ व्या अध्यायात सुरहा कहेफ मध्ये एका गुहेत ३०७ वर्षे झोपलेल्या सहा माणसं व एक कुत्रा कसा जिवंत केला.. याचं विस्तृत वर्णन वाचून अल्लाह ( परमेश्वर – ईश्वरा) च्या अफाट शक्तीची जाणीव होतें. जगात केलेल्या चांगल्या– वाईट कामांचं हिशोब घेण्यासाठी...हे जीवन चक्र आहे... त्यालाच काल चक्र म्हणतात.

हें सर्व कालचक्र अदृश्य कोण तरी चालवत असतो, हें आपल्या विचार करण्या पलीकडचं आहेत.. येथे विज्ञान हीं पोहचू शकत नाहीत.. हें विज्ञानाच्या क्षमते बाहेरचे, असंख्य पटीने क्षमते बाहेर चे. याची एक व्याख्या करताच येणार नाहीत , .

दिव्य कुरआन पारा न. १५ मधे अल्लाह सांगतात की ,'' हें पैगंबर (स्व.सल्लम ) ! लोकांना सांगा की , जर सात ही समुद्र हे माझ्या पालनकरत्याच्या गोष्टी लिहिण्यासाठी शाई( इंक )(लिहीण्याची) बनला तर , तो समुद्राची शाई संपेल , परंतु पालणकरत्याच्या गोष्टी संपणार नाही ; हो , इतकेच नव्हे तर पुन्हा तितकीच शाई आम्ही आणली तरी देखिल पुरेशी ठरणार नाही ,'' (सुराहा अल – कहफ आ..नं.१०९ ).

प्रसिद्ध भौतिक शास्रज्ञ लॉर्ड केलवीन नें म्हटले की, तुम्ही सृष्टीवर जेवढे जास्त चिंतन, मनन, संशोधन कराल, तेवढे तुम्हाला ईश्वराच्या ( अल्लाह ) च्या अस्तित्वाची अनुभूती येईल आणि तेवढ्या जवळ तुम्हीं ईश्वरा ( अल्लाह – परमेश्वर ) राच्या जवळ पोहोचाल. बुद्धी आणि विवेकाच्या जेवढा विचार कराल तेवढ्या निष्कर्षा जवळ येऊ की, या अधभूत, अकल्पनीय अंनत अशा ब्राह्मनंड ( विश्व )चा कोण तरी एक निर्माण ( निर्मिक ) कर्ता, एक स्वामी, रचियता, आणि जबरदस्त महा शक्तिशाली महान आहे.

सारी सृष्टी ईश्वराचे
अस्तित्व पुकारणारी असे वाटे,
सर्वत्र ईश्वरी चमत्कार !
सारी सृष्टी परमेश्वराचा महिमा
जणू मुक्यानें गात आहे,
जिव्हा प्रत्येक पानांत !
ध्वनि प्रत्येक
निरझरी सर्वत्र धूमत,
वाणी वाऱ्यावर
धरेवरी निरभ्र गगनी आहे,
महान पुरामध्ये
सर्वत्र ईश्वरी वाणी !
नावेक न विसावते !!
महात्मा
ज्योतीराव फुले..



डॉ. सलीम शेख
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

### बनसोडे इंग्लिश स्कूलमध्ये आनंद बाजार उत्साहात



**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील माका येथील गुणवत्ता, संस्कार व संस्कृती जपणारी शाळा म्हणून अल्पावधीतच लौकिक मिळवलेल्या कै. तात्याबा बनसोडे इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये आनंद बाजार, आनंद नगरी उपक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे संचालक अध्यक्षस्थानी अहिल्याबाई होळकर माध्यमिक विद्यालय देडगावचे प्राचार्य स्वरूपचंद गायकवाड हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मल्हारी आखाडे, आदिनाथ सोलाट, कचरू सानप, गोकुळ लोंढे, सहदेव लोंढे, बापूसाहेब तवार, अंबादास लोंढे, मच्छिंद्र लोंढे, दिगंबर शिंदे यांचे सह अनेक मान्यवर पालक, माता पालक उपस्थित होते. सदर उपक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे संचालिका श्रीमती मीना बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली शुभांगी सानप , उषा गीते, जयश्री जगताप, रीना पटेकर, वैशाली आव्हाड, भक्ती औटी,चंदा शिरसाठ यांनी परिश्रम घेतले.

### जिल्हा उर्दू साहित्य परिषदेत अफसाना तांबोळी यांचा सन्मान



**सोनगाव** : अहिल्यानगर जिल्हा उर्दू साहित्य परिषद यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय उर्दू शिक्षक गौरव सोहळ्यात सोनगाव येथील उर्दू शाळेच्या अफसाना जावेद तांबोळी यांना 'आदर्श शिक्षिका' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या शैक्षणिक कार्याची आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या परिश्रमांची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मोहम्मद भाई तांबोळी, उपाध्यक्ष रियाज कुरेशी, सोनगावचे उपसरपंच एजाज तांबोळी, मुख्याध्यापक रोफ, आरिफ तसेच सर्व समिती सदस्य आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी व माजी विदयार्थी समितीने त्यांचे अभिनंदन केले. या सन्मानामुळे सोनगाव परिसरात समाधानाचे वातावरण असून, शिक्षकांच्या कार्याला मिळालेली ही दाद प्रेरणादायी असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### घोडेगाव येथे मांगिरबाबा यात्रेला प्रारंभ

**सोनई** : नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथील सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या मांगिरबाबा यात्रेला सोमवार, दि. २ पासून उत्साहात प्रारंभ झाला. गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून यात्रा कमिटीने धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन केले आहे. सोमवारी नृत्य स्पर्धेने उत्सवाची सुरुवात झाली. मंगळवारी रांगोळी स्पर्धा होणार असून विजेत्यांना रु. ३१००, २१०० व ११०० अशी पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. पहाटे ५ वाजता कावड मिरवणूक, सकाळी नैवेद्य व पारंपरिक विधी पार पडणार आहेत. रात्री नामांकित बँडपथकांची जुगलबंदी रंगणार आहे. बुधवारी कै. तुकाराम खेडकर सह पांडुरंग मुळे मांजरवाडीकर यांच्या लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम होणार असून स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे. यात्रेनिमित्त मोठी गर्दी अपेक्षित आहे.

### सोनई येथे मोफत आरोग्य शिबीर संपन्न

**सोनई** : सोनई येथील श्रीराम मंदिर मंगल कार्यलयात नुकतेच मोफत आरोग्य शिबीर पार पडले. याप्रसंगी ७५रुग्णांनी सहभाग नोंदवून १५ लोकांची तपासणी करून उपचार करण्यात आले. मधुमेह, रक्तदाब, थायराईड, अशा विविध आजाराने त्रस्त झालेल्या महिला उपस्थित होत्या. पुणे येथील आरोग्य संजीवनी फॅमिलीच्या वतीने डॉ आश्रुबा खेडकर, यांनी सविस्तर आरोग्याच्या सोप्या टिप्स देऊन रक्तदाब, सांधेवाद, आमवात, गुडघेदुखी, पक्षांघात, प्यारलेसेस, मानपाठ, कमरदुखी, मणक्याचे विकराबाबद उपस्थितांना मार्गदर्शन करताना आपल्याला दैनंदिन आहारमधे शारीरा साठी आवश्यक असणारे घटक जसे की प्रोटीन, फायबर, पाणी पिण्याचे महत्व तसेच कॅलरी मॅनेजमेन्ट या विषयी माहिती दिली. याप्रसंगी बीड जिल्ह्यातील गेवराई येथील प्राथमिक शाळेचे शिक्षक स्मिता व राजाभाऊ बनसोडे सह सहकारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा. भारती सुद्रिक, सूत्रसंचालन जागतिक आरोग्य सल्लगार आराधना सातपुते, व अनिकेत सातपुते यांनी केले आभार प्रदर्शन श्री कृष्णा सुद्रिक यांनी केले. या वेळी आरती काटकर सातपुते, शुभम अंबाडे, पुणे येथील अरुण जगताप यांच्यासह सोनई व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# तळेगाव पाणीपुरवठा योजनेचे १० कोटींचे वीज बिल माफ करा

## जलजीवन निधी वाढीची चौकशी करा । आ. अमोल खताळ यांनी पाणीपुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर विधानसभा मतदारसंघातील घुलेवाडी गावात सुरू असलेल्या जलजीवन मिशनअंतर्गत 'हर घर जल' योजनेच्या खर्चात झालेल्या मोठ्या वाढीची सखोल चौकशी करावी, तसेच तळेगाव दिघे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे १० कोटी रुपयांचे थकीत वीज बिल माफ करावे किंवा विशेष सवलत द्यावी, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी विधिमंडळात केली. या दोन्ही गंभीर प्रश्नांकडे त्यांनी पाणीपुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधले.

> दरम्यान, पाणीपुरवठा सुरळीत नसतानाही तळेगाव दिघे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेवर तब्बल १० कोटी रुपयांचे वीज बिल थकीत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. शासनाने या थकीत वीज बिलाची माफी करावी किंवा त्यात विशेष सवलत द्यावी, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी करत या महत्त्वाच्या प्रश्नांकडे विधिमंडळाचे लक्ष वेधले.

आमदार खताळ म्हणाले की, घुलेवाडी येथील 'जल जीवन मिशन' अंतर्गत 'हर घर जल' योजनेची सुरुवातीची अंदाजित किंमत ८१ कोटी रुपये होती. मात्र सध्या या योजनेचा खर्च वाढून तो १२५ कोटी रुपयांपर्यंत गेला आहे. प्रस्तावित निधीतील ही मोठी वाढ संशयास्पद असून त्याची सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. काही ठराविक राजकीय पक्षाशी संबंधित ठेकेदारांनाच कामे देण्यात आल्याचा गंभीर आरोपही त्यांनी सभागृहात केला.

याशिवाय घुलेवाडी, धांदरफळ बुद्रुक, चंदनापुरी, जवळे कडलग, साकूर, निमगाव भोजापूर आणि अकलापूर या गावांतील प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचीही चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली. संबंधित योजनांच्या कामकाजात पारदर्शकतेचा अभाव असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

## राहुरीत पूर्ववैमनस्यातून घरात घुसून दांपत्याला मारहाण

### विनयभंगाचाही गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील खडकवाडी परिसरात १९ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास एका २५ वर्षीय विवाहितेच्या घरात घुसून तिला व तिच्या पतीला बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी सात जणांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुन्या भांडणाची कुरापत काढून आरोपींनी पीडित महिला, तिचे पती आणि मुलाला शवीगाळ करत लोखंडी गजाने मारहाण केली. तसेच 'नादी लागलात तर जीवे मारू' अशी धमकीही दिली. मारहाणीदरम्यान आरोपींनी पीडितेचे केस ओढून तिच्याशी लज्जास्पद वर्तन केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. भैय्या पका साळुंके, पका साळुंके, शरद साळुंके, आंबु साळुंके, रामा गर्दे, दिपक गर्दे, आणि संतोष गर्दे (सर्व रा. खडकवाडी), अशी आरोपींची नावे आहेत. पीडितेच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये (मारहाण, धमकी व विनयभंग) गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विकास वैराळ पुढील तपास करत आहेत.

## भारतातील पहिले 'जातमुक्त' गाव सौंदळा; विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी अनुभव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील सौंदळा या गावाने माझी जात – मानव ही संकल्पना प्रत्यक्षात राबवत देशासाठी आदर्श निर्माण केला आहे. भारतातील पहिले जातमुक्त गाव म्हणून ओळख निर्माण केलेल्या या गावाला रयत शिक्षण संस्था संचलित रावबहादुर नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर येथील राज्यशास्त्र विभागाच्या 'विचारवेध विद्यार्थी मंच'च्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलीत भेट दिली. राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. मेघराज एकनाथ औटी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या सहलीत विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच शरदराव आरगडे यांची भेट घेऊन जातमुक्त ठरावाची माहिती जाणून घेतली. ५ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबिरानंतर झालेल्या ग्रामसभेत हा ऐतिहासिक ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.




गावात कोणाचीही ओळख आता जातीने नव्हे, तर माणूस म्हणूनच होईल. सार्वजनिक ठिकाणे, शाळा, मंदिरे, विहिरी, स्मशानभूमी सर्वांसाठी समान असतील. जातीय अपशब्द, भेदभाव किंवा सोशल मीडियावर द्वेषपूर्ण संदेश पसरवणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे सरपंच आरगडे यांनी स्पष्ट केले. गावाने यापूर्वी शिवीगाळबंदी, विधवा सन्मान यांसारखे पुरोगामी ठराव केले असून, जातमुक्तीचा हा निर्णय सामाजिक क्रांतीचा कळस ठरल्याचे त्यांनी नमूद केले.

विधवा पुनर्विवाहास प्रोत्साहन, हुंडाविरोधी मोहीम आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्याचे प्रयत्नही या ठरावातून सुरू झाले आहेत. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी गावात प्रभातफेरी काढून ग्रामस्थांशी संवाद साधला. एका वयोवृद्ध ग्रामस्थाने सांगितले, आमच्या मुलांना आता जात नाही, फक्त माणूस म्हणून ओळख आहे. गावातील शाळेत विद्यार्थ्यांनी एकत्र शिक्षण, खेळ आणि जेवण करताना दिसलेले चित्र समतेचे जिवंत प्रतीक ठरले. सुमारे २,५०० लोकसंख्या असलेल्या या गावात शेती हा मुख्य व्यवसाय असून, पुढील पिढ्यांसाठी समतेचा वारसा निर्माण करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे.

छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत भारतीय संविधानातील समता आणि बंधुतेचे मूल्य सौंदळाने प्रत्यक्षात उतरवले आहे. ही शैक्षणिक सहल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या व रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूरच्या अध्यक्षा मीनाताई जगधने यांच्या प्रेरणेने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण बडदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. प्रा. राहुल राऊत, प्रा. कल्पना कांबळे आणि प्रा. रवींद्र आदमाने यांनी सहलीसाठी विशेष परिश्रम घेतले.

संविधान वाचले होते; पण आज ते जगताना पाहिले. सौंदळाने आम्हाला खरे शिक्षण दिले, अशी प्रतिक्रिया एका सहभागी विद्यार्थ्याने व्यक्त केली. सौंदळा गावाचा हा उपक्रम राज्यासह देशासाठी प्रेरणादायी ठरत असून, इतर गावांनीही हा आदर्श स्वीकारावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## नेवासा शहरातील 'रामकृष्ण हरी' प्रभातफेरीला १४ वर्षे पूर्ण

### सेवेकऱ्यांचा माऊली चरणी कृतज्ञ नमस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : राजस्थान जोधपूर येथील गोवत्स परमपूज्य राधाकृष्ण महाराज आणि देवगड गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख राष्ट्रसंत महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या निर्देशानुसार नेवासा शहरात पहाटेच्या सुमारास रामकृष्ण हरी जय जय रामकृष्ण हरी असा जप करत जाणाऱ्या नेवासा येथील प्रभात फेरीला आज चौदा वर्षे पूर्ण झाले. त्यामुळे प्रभात फेरीतील सर्व सेवेकऱ्यांनी माऊली चरणी नतमस्तक होऊन पैस खांबाचे दर्शन घेतले.



तब्बल चौदा वर्षांचा हा कालावधी पूर्ण करत पंधराव्या वर्षात पदार्पण करणारी ही प्रभात फेरी आज नेवाशातील नागरिकांची श्रद्धा, निष्ठा आणि भक्ती जिव्हाळ्याचा विषय ठरली आहे. दररोज पहाटे 'राम कृष्ण हरी'च्या अखंड नामजपाने संपूर्ण नेवासा नगरी पवित्र करणारी ही परंपरा अखंडपणे सुरू आहे. प्रभात फेरीच्या पहिल्या दिवशी हजारो नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. स्वतः राधाकृष्ण महाराज यांच्या उपस्थितीत पहिली फेरी निघाली आणि त्या मंगल क्षणापासून या उपक्रमाला भक्तिभावाची भक्कम पायाभरणी लाभली. आठवडयात प्रत्येक दिवशी नेवासा शहरातील विविध भागांतून फिरणारी ही राम कृष्ण हरीनामजप करणारी प्रभात फेरी समाजातील सर्व घटकांना एकत्र आणणारी ठरली आहे. या फेरीचे ज्येष्ठ व सन्माननीय सदस्य म्हणून बाबुराव ढवळे सर,डॉ. मुरलीधर कराळे सर,अनंतराव नळकांडे,अंबादास देशपांडे,सुनिल मैदाड,अर्जुन रणमले, चंद्रकांत डाके,कुमार शिंदे,अशोक गरुटे,ज्ञानेश्वर वाघ, गरुटे मावशी आणि रोहिणी मापारी हे कार्यरत आहेत.

चौदा वर्षपूर्तीच्या निमित्ताने ज्ञानेश्वर मंदिर प्रांगणात उद्योजक उमेश शिंदे यांच्या हस्ते प्रभात फेरीतील सर्व सन्माननीय वारकरी सदस्यांचा सत्कार करण्यात आला.तसेच या प्रभात फेरीच्या सर्व सदस्यांना पुढील अनंत काळासाठी प्रेस क्लबच्या वतीने अध्यक्ष गुरुप्रसाद देशपांडे यांनी शुभेच्छा दिल्या.

## राहाता महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहाता** : येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सायन्स असोसिएशन व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन विद्यार्थ्यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील माजी विद्यार्थिनी ए.आय.टी,जालना येथील गायत्री सदाफळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोमनाथ घोलप यांनी त्यांचा सत्कार करून अध्यक्षस्थान भूषविले. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त महाविद्यालयात पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा व आकर्षक रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पोस्टर स्पर्धेत ४५ पोस्टर्स सादर करण्यात आली असून ९० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रा. डॉ. विक्रम भालेकर, डॉ. अमोल पगारे, प्रा. गोपीनाथ शिरोळे व प्रा. चंद्रकांत बनसोडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाच्या प्रारंभी कावेरी घोरपडे हिने प्रास्ताविक केले, तर तुषार गवांदे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर गायत्री सदाफळ यांनी विद्यार्थ्यांना संशोधन क्षेत्रातील संधी, पीएच.डी. कशी करावी व शोधनिबंध लेखनाची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रेरित केले. कॅम्पस मुलाखतीत महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील भारत नरोडे, कार्तिक गवळी, ओमकार लोंढे, आदित्य चिने, तुषार गवांदे, निखिल डांगे यांची निवड झाल्याबद्दल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर मैथिली जेजुरकर हिने मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. सत्यजित पोतदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत महान शास्त्रज्ञ सी.व्ही.रमन यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला तसेच 'रमण परिणाम' याबाबत माहिती दिली. एम.एस्सी. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी स्वाती नळे हिने आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा बोठे आणि स्नेहल सोमवंशी यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सामुदायिक विवाह सोहळा काळाची गरज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहाता** : अनेक सामाजिक संघटना प्रतिष्ठाण सामाजिक विवाह सोहळा संपन्न करत असतात. या सोहळ्यामध्ये अनेकांची लग्न विना मोबदला लावली जातात. यामुळे वाढत्या महागाईचा फायदा मुला मुलींच्या आई वडिलांना होतो. शिर्डी येथील साईसिध्दी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने दरवर्षी सामाजिक विवाह सोहळा पार पडतो. यावर्षी तब्बल ५१ जोडप्यांचा सामाजिक व सोहळा पार पाडला. या सोहळ्यामध्ये राहाता तालुक्यातील नपावाडी येथील ग्रामस्थांनी देखील उस्फूर्त सहभाग घेतला. सामुदायिक सोहळ्यात लग्न झालेल्या जोडप्यांचा नपावाडी ग्रामपंचायतीच्या वतीने सन्मान करण्यात आला. आपल्या मुला मुलींचे विवाह सामाजिक विवाह सोहळ्यातच करा अनावश्यक खर्चात फाटा द्या असा संदेश या निमित्ताने देण्यात आला.परिसरातील आर्थिक खर्च सध्या शेतीवर अवलंबून आहे मात्र वेळेत पाऊस न झाल्यामुळे शेतीची अर्थव्यवस्था डबघाईस आली आहे. अशातच आपल्या मुला मुलींच्या लग्नासाठी कर्ज काढून उसणवाडी करून लग्न उरकली जातात. यामध्ये लाखो रुपयांचा अनावश्यक खर्च होतो. मुला मुलींचे लग्न झाल्यानंतर हे कर्ज फेडण्यासाठी आई बापाला मोठ्या समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे आपल्या मुला मुलींचे लग्न सामुदायिक विवाह सोहळ्यात करावे असे आवाहन ग्रामपंचायतीच्या वतीने केले.

## राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेत प्रवरा पब्लिक स्कूलचे घवघवीत यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरानगर येथील प्रवरा पब्लिक स्कूलने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एन एम एम एस) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले अशी माहिती प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे यांनी दिली. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना परीक्षेत प्रवरा पब्लिक स्कूलचे इयत्ता आठवीचे २५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यामध्ये १४ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. सातत्यपूर्ण प्रयत्नातून विद्यार्थ्यांनी ही पात्रता मिळवली आहे. हे यश केवळ विद्यार्थ्यांचे नाही तर शाळा, पालक आणि संपूर्ण परिसरासाठी अभिमानास्पद आहे. विद्यार्थ्यांची जिद्द आणि शिक्षकांचे अथक प्रयत्न यामुळे हे यश साध्य झाले आहे. यासाठी प्रवरा पब्लिक स्कूलचे प्राचार्य डॉ बी बी अंबाडे, उपप्राचार्य श्री के टी अडसूळ, पर्यवेक्षिका सौ एम एस जगधने, सौ शुभांगी रत्नपारखी, परीक्षा समन्वयक ज्योती गायकवाड यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

# कांद्याच्या भावाचा वांदा झाल्याने शेतकरी हवालदिल, प्रचंड असंतोष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : दिवसेंदिवस कांद्याचे प्रति क्विंटलचे दर कोसळत चालल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यामध्ये सध्या प्रचंड असंतोष पसरला असून कांद्याला मिळणाऱ्या अत्यंत कमी दरामुळे कांदा उत्पादक शेतकरी मात्र चांगलाच हवालदिल झाल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. अहिल्यानगर जिल्हयातील बहुसंख्य शेतकऱ्यांचे अर्थकारण या कांदा पिकांवर अवलंबून राहत असतांना मात्र अशातच कांदा पिकाला गेल्या काही महिन्यांपासून अत्यल्प भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप निर्माण झालेला आहे,कांद्याचे प्रति क्विंटलचे दर आता कोसळत चालल्यामूळे नगर जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या हवालदिल झाल्याचे दिसून येत आहे. कांद्याला मिळणाऱ्या या कमी भावामुळे आता शेतकरी संघटना आंदोलन करणार असल्याची माहिती विधिज्ञ बाळासाहेब कावळे यांनी यावेळी बोलतांना दिली.



महाराष्ट्रात बहुतांशी ठिकाणी कांदा पीक असून या कांदा पिकाचा भाव सध्या चार ते पाच रुपये किलो दर झालेला असल्यामुळे शेतकऱ्यांनी आपला कांदा बाजारात न आणता केवळ भावाची हालचाल पाहण्यासाठी शेतकरीवर्ग मोठ्या संख्येने कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात भावाची हालचाल पाहतांना दिसून येत आहे कांदा पिकाच्या या भावामुळे शेतकरी चांगलाच संकटात आलेला असून शेतकरी संघटना आता कांदा भावासाठी आंदोनल छेडण्याच्या तयारीत असल्याची माहिती यावेळी बोलतांना विधिज्ञ बाळासाहेब कावळे यांनी दिली.

एकीकडे ऊस ऊस उत्पादक शेतकऱ्याचे पेमेंट दोन – तीन महिन्यापासून रखडलेले असून दुसरीकडे सरकार खोटे आश्वासन देऊन शेतकऱ्याचा सातबारा कोरा करत नाही अशातच कांदा भाव चार ते पाच रुपये किलो दराने चालू आहे त्यामुळे शेतकरी चांगलाच हवालदिल झालेला आहे. प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन त्वरित कांदा भाव वाढविण्यासाठी उपाययोजना करावी.

अन्यथा शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष विधिज्ञ अजित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली नेवासा तालुका शेतकरी संघटना औरंगाबाद उच्च न्यायालयात धाव घेवून शेतकरी संघटना तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा विधितज्ञ बाळासाहेब कावळे यांनी दिला आहे.

# संजीवनी फार्मसीच्या तीन विद्यार्थ्यांची तैवान विद्यापीठांमध्ये शिष्यवृत्तीसह इंटर्नशिपसाठी निवड

## संजीवनी इंटरनॅशनल रिलेशन विभागाच्या प्रयत्नांचे फलित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : संजीवनी शिक्षण संस्थेच्या इंटरनॅशनल रिलेशन विभागाच्या प्रभावी आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे संजीवनी बी. फार्मसी महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांची तैवान सरकारच्या शिष्यवृत्तीवर तैवानमधील तीन वेगवेगळ्या विद्यापीठांत अनुक्रमे तीन, चार आणि सहा महिन्यांच्या कालावधीसाठी इंटर्नशिप (आंतरवासिता) साठी निवड झाली आहे.




> मागील चार वर्षांपासून इंटरनॅशनल रिलेशन विभाग सातत्यपूर्ण आणि नियोजनबद्ध कार्य करत असून त्याचे यश विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या आंतरराष्ट्रीय संधींतून दिसून येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर व्यासपीठ मिळावे, हा संस्थेचा ठाम प्रयत्न आहे. मात्र या संधींचे सोने करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वतः स्वीकारली पाहिजे. संस्थेचे संस्थापक स्वर्गीय शंकरराव कोल्हे यांची नेहमीच इच्छा होती की ग्रामीण विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले वेगळेपण सिद्ध करावे.
>
> **श्री अमित कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी, संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स**

या निवडीमुळे विद्यार्थ्यांना अत्याधुनिक प्रयोगशाळांमध्ये संशोधन कार्य करण्याची, आंतरराष्ट्रीय तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची तसेच जागतिक स्तरावरील शैक्षणिक वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. पत्रकात पुढे म्हटले आहे की सई प्रकाश रासकर हिची काओशुंग मेडिकल युनिव्हर्सिटी मध्ये, प्रसाद बाळासाहेब चांदे याची आय-शौ युनिव्हर्सिटी व सर्वेश मयुर जोशी याची नॅशनल चांगहुआ युनिव्हर्सिटी मध्ये अनुक्रमे तीन, चार सहा महिन्यांच्या इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे.

यापुर्वीही इंटरनॅशनल रिलेशन विभागाच्या प्रयत्नाने रसिया, फिलिपाईन्स, कॅनडा, युके, जपान व तैवान मधिल विविध विद्यापीठांमध्ये संपुर्ण स्कॉलरशिपवर २३० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी तीन ते सहा महिण्यांची इंटरर्नशिप पूर्ण करून आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढविल्या आहेत. संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांनी निवड झालेले सर्व विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार केला. यावेळी पालक वर्षा रासकर, प्रकाश रासकर, अनिता चांदे , बाळासाहेब चांदे, सुप्रिया जोशी , संजीवनी बी. फार्मसी महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. विपुल पटेल, इंटरनॅशनल रिलेशन डीपार्टमेंटचे डीन डॉ. महेंद्र गवळी व याच विभागाच्या समन्वयीका डॉ. प्रेरणा जाधव उपस्थित होते.

## पान १ वरुन

### सिंहस्थासाठी पोलिसांना मिळणार १० हजार स्वयंसेवक, होमगाड्सची साथ

क्षमता मजबुतीसाठी गृहरक्षक दल व नागरी संरक्षण दलाच्या स्वयंसेवकांना व्यापक चौकटीत एकत्रित केले जाईल. त्यांची भूमिका सहायक स्वरूपाची असेल. रांगेचे नियमन, निर्वासन समर्थन आणि उच्च घनतेच्या परिस्थितीत समन्वय साधणे, आपत्तीत मदत करणे, गर्दीचे नियोजन, आग प्रतिबंधात्मक उपाययोजना अशा विविध पातळ्यांवर या सर्वांना प्रशिक्षण दिले जाईल. कुंभमेळ्यापूर्वी गर्दी आणि आपत्कालीन परिस्थितीत तयारी सुनिश्चितीसाठी मॉकड्रिलही घेतले जाईल, असे प्राधिकरणाकडून सांगण्यात आले.

### कुलस्वामिनी कला केंद्राची तोडफोड

असलेल्या महिलांनी प्रसंगावधान दाखवत स्वतःचा जीव वाचवला. जमावाचा रौद्र अवतार पाहून त्यांनी तात्काळ कार्यक्रम थांबवला आणि सुरक्षित खोलीत आश्रय घेतला. योग्यवेळी घेतलेल्या या निर्णयामुळे मोठा अनर्थ टळला, मात्र महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.
दरम्यान, हे कला केंद्र अनधिकृत असल्याचा आरोप करत आडूळ परिसरातील सुमारे २० गावांतील ग्रामस्थांनी ते बंद करण्याची मागणी यापूर्वीच केली होती. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई न झाल्यानेच हा जनआक्रोश उफाळून आल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.
घटनेनंतर पाचोड पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे संकेत पोलिसांकडून देण्यात आले आहेत. ही घटना केवळ एका वादापुरती मर्यादित नसून, ग्रामीण भागातील सामाजिक तणाव आणि प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली आहे.

### दुबई विमानतळावर अहिल्यानगरचे नागरिक अडकले

प्रवाशांमध्ये, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. आम्ही सुरक्षित आहोत, पण विमान कधी सुटेल याची शाश्वती नसल्याने ताटकळत उभे आहोत, अशी माहिती एका प्रवाशाने दिली.
अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांनी केंद्र सरकार आणि परराष्ट्र मंत्रालयाकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. दुबईतील भारतीय दूतावास अडकलेल्या प्रवाशांच्या संपर्कात असून, परिस्थिती पूर्वपदावर येताच त्यांना विशेष विमानाने मायदेशी आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे समजते.
पुण्याचे ८० विद्यार्थी: पुण्यातील एका नामांकित महाविद्यालयाचे ८० विद्यार्थी आणि ४ शिक्षकही दुबईत अडकले आहेत.
हवाई वाहतूक: जोपर्यंत युद्धजन्य परिस्थिती निवळत नाही, तोपर्यंत आखाती देशांतून येणारी आणि जाणारी विमाने विलंबाने किंवा रद्द होण्याची शक्यता आहे.

### पश्चिम आशियात युद्धाचा भडका!

२७ ठिकाणांवर हल्ला चढवला आहे. अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यांमध्ये इराणचे सलग ३७ वर्षे सत्ता गाजवणारे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी आणि इराणच्या सशस्त्र दलाचे प्रमुख अब्दुल रहीम मौसवी मारले गेले आहेत. इराणने अमेरिका आणि इस्त्रायलच्या हल्ल्यानंतर पहिल्यांदा अमेरिकन लष्कराला भूमी देणाऱ्या शेजारील देशांनाच टार्गेट करत मोठा हल्ला केला आहे. हत्येचा बदला घेण्यासाठी इराणने संयुक्त अरब अमिराती (दुबई), कतार (दोहा) आणि बहरीन (मनामा) मधील अमेरिकन लष्करी तळांवर आणि मालमत्तांवर रविवारी (१ मार्च) सलग दुसऱ्या दिवशी हल्ले केले. ओमान (अमेरिका आणि इराणमध्ये मध्यस्थी) वगळता जवळपास सर्वच आखाती देशांमधील तळांना लक्ष्य करण्यात आले आहे.
इराणने युएईवर १३७ क्षेपणास्त्रे आणि २०९ ड्रोन डागले, ज्यामुळे दुबईतील पाम जुमेराह, बुर्ज अल-अरब आणि जेबेल अली या महत्त्वाच्या पोर्टवर आग आणि धुराचे लोट पाहायला मिळाले. अबू धाबी विमानतळावर झालेल्या हल्ल्यात १ जण ठार तर ७ जण जखमी झाले. तसेच, कतारच्या दिशेने ६५ क्षेपणास्त्रे आणि १२ ड्रोन डागण्यात आले, ज्यामध्ये १६ जण जखमी झाले. इराणच्या 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स'ने इस्त्रायलमधील २७ अमेरिकन तळ, इस्त्रायली सैन्याचे तेल अवीवमधील मुख्यालय आणि तेल नोफ हवाई तळावर थेट हल्ले केले आहेत.

# जिथे विज्ञान थांबते, तिथे अध्यात्म सुरू होते

## ह.भ.प. प्रकाशनंदगिरीजी महाराज



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** विज्ञान आपल्याला सुविधा देते, परंतु मन:शांती आणि समाधान हे केवळ अध्यात्मातूनच मिळते. जिथे विज्ञान थांबते, तिथे अध्यात्म सुरू होते, असा मोलाचा संदेश प्रकाशनंदगिरीजी महाराज यांनी दिला. जामगाव येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी ते बोलत होते.

आधुनिक युगातील धावपळीच्या जीवनात माणूस भौतिक सुखांच्या मागे धावत असला तरी त्याला खरी शांती आणि समाधान अध्यात्मातूनच प्राप्त होते, असे त्यांनी ठामपणे सांगितले. भगवान श्रीकृष्ण यांच्या चरित्रातून भक्ती, कर्तव्य आणि प्रेम यांचे सुंदर उदाहरण त्यांनी मांडले. कृष्ण म्हणजे केवळ पूजनीय देव नव्हे, तर जीवन जगण्याची एक सुंदर कला आहे, असे त्यांनी प्रभावी शब्दांत स्पष्ट केले.

यावेळी बोलताना त्यांनी आई-वडिलांची सेवा हीच खरी पूजा असल्याचे सांगितले. आई-वडिलांना सांभाळा, त्यांच्यावर जीव लावा. त्यांच्या आशीर्वादातच जीवनाचे खरे यश दडलेले आहे, असे भावनिक आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

संतांचे मोठेपण शब्दांत मावणारे नसते. त्यांचे जीवन म्हणजे त्याग, प्रेम, करुणा आणि सत्य यांचा साक्षात संगम असतो. त्यांच्या एका ओव्यात, एका अभंगात किंवा एका वचनात संपूर्ण जीवनाला दिशा देण्याची ताकद असते, असेही ते म्हणाले.

सप्ताहाच्या सांगता प्रसंगी भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. वातावरण भक्तिमय आणि उत्साहपूर्ण झाले होते. महाराजांच्या ओजस्वी कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भरड धान्यावर राष्ट्रीय परिषद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र विभागांतर्गत भरड धान्य संशोधन व प्रशिक्षण केंद्रातर्फे ६ व ७ मार्च २०२६ रोजी शाश्वत भविष्यासाठी भरड धान्ये : प्राचीन धान्यांची क्षमता उलगडताना या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेचा विषय शाश्वत शेती, पोषणसुरक्षा आणि पारंपरिक धान्यांचे पुनरुज्जीवन यांना अनुसरून निश्चित करण्यात आला आहे.

ही परिषद विद्यार्थी, संशोधक, उद्योजक तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी खुली आहे. नाचणी, ज्वारी, बाजरी, कोद्रा, सावा, राळं आदी भरड धान्यांवरील संशोधन, त्यांचे पोषणमूल्य, अन्नप्रक्रिया उद्योगातील संधी तसेच उद्योजकतेचे विविध पैलू यांवर परिषदेत सखोल चर्चा होणार आहे. शेतकऱ्यांसोबत विशेष संवाद सत्रांचे आयोजन करण्यात येणार असून त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवांतून शेतीतील आव्हाने, संधी आणि नव्या तंत्रज्ञानाची माहिती सहभागींस मिळणार आहे.परिषदेत भरड धान्यांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व, पोषणातील वैविध्य, बदलत्या हवामानात तग धरण्याची क्षमता, जनुकशास्त्रीय संशोधनातील बहुआयामी अभ्यास पद्धती, मूल्यवर्धन प्रक्रिया तसेच अन्नप्रक्रिया उद्योगातील नवकल्पना या विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. यासोबतच भरड धान्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार असून विविध उत्पादनांचे माहिती व विक्री कक्ष उभारण्यात येणार आहेत. परिषदेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संयोजक व विभागप्रमुख प्रा. मिलिंद सरदेसाई, प्रा. अल्ताफहुसैन नदाफ आणि डॉ. हेमलता कोतकर यांनी केले आहे.नोंदणीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर भेट द्यावी. अधिक माहितीसाठी ७७५७८६२८२८ किंवा ७०८३८६१२२१ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा.

## भांडण वाढू नको, म्हणाल्याचा राग आल्याने मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** गावचे पोलीस पाटील घरी येऊन भांडण मिटवून गेले आहेत, तु आता भांडण वाढवू नको, असे म्हणाल्याचा राग आल्याने सुनिता हारदे यांना सासू, भाचा व नणंदेने शिवीगाळ करुन दगड व लाथा बूक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दि. २६ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास घडली आहे.

सुनिता शिवनाथ हारदे, वय ३५ वर्षे, ह्या त्यांच्या कुटुंबासह राहुरी तालुक्यातील तुळापुर येथे राहत असून शेजारीच त्यांची सासू जनाबाई व सासुरे वेनूनाथ हे राहवयास आहेत. दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास सुनंदा हारदे ह्या त्यांच्या घरी असताना आरोपी घरासमोर आले.

तेव्हा किरण औताडे हा म्हणाला कि, काल तु माझ्या आजीला काय म्हणाली होती? त्यावेळी सुनंदा हारदे म्हणाल्या कि, आज सकाळी आपल्या गावचे पोलीस पाटील बाळकृष्ण हारदे यांनी घरी घेवून भांडण मिटून गेले आहेत. तु आता भांडण वाढू नको. तेव्हा आरोपींनी सुनंदा हारदे यांना शिवीगाळ करुन दगड व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली.

सुनिता शिवनाथ हारदे यांच्या फिर्यादीवरून आरोपी जनाबाई वेनूनाथ हारदे, रा. तुळापुर, ता. राहुरी, आणि किरण गोरक्ष औताडे, शोभा गोक्षनाथ औताडे, दोघे रा. माळेवाडी, ता. श्रीरामपुर, या तिघांवर गुन्हा रजि. नं. १८६/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ११५ (२), ३५१ (२), ३५२, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

## शस्त्रक्रियेनंतरही सहा वर्षीय अल्तमशचा पहिला रोजा पूर्ण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**गंगापूर :** जिद्द, श्रद्धा आणि संयम यांचा संगम काय असतो, याचे उदाहरण वैजापूर येथील सहा वर्षीय अल्तमश नवाज पटेल याने आपल्या कृतीतून दाखवून दिले. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी अल्तमशने रमजान महिन्यातील आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत सुमारे तेरा तास अन्न-पाण्याचा त्याग करत त्याने उपवास पूर्ण केला.विशेष म्हणजे, अल्तमशच्या पायावर दीड महिन्यापूर्वी शस्त्रक्रिया झाली असून डॉक्टरांनी अद्याप चालण्यास मनाई केली आहे.
या अल्लाह, तौफीक दे,' या निर्धाराने त्याने रोजा पूर्ण केल्याने परिसरात त्याचे विशेष कौतुक होत आहे.अल्तमश हा रयत शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष ईसाक पटेल आणि पत्रकार खाजा पटेल यांचा भाचा आहे. त्याच्या या जिद्दीचे पटेल परिवारासह वैजापूर परिसरातील ग्रामस्थांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. लहान वयातच संयम, श्रद्धा आणि चिकाटीचे दर्शन घडवणाऱ्या अल्तमशच्या कृतीची सर्वत्र चर्चा होत आहे.

## कवितेमुळे माणूस समृद्ध होतो : कवी यशवंत पुलाटे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**लोणी :** मानवी मनाच्या भावसंवेदना कमीत कमी शब्दांत व्यक्त करून त्या श्रोत्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी साधन म्हणजे कविता. कवितेच्या निमित्ताने जमलेला गोतावळा हा भावबंध दृढ करणारा असतो. कवितेमुळे माणूस समृद्ध होतो, असे प्रतिपादन कवी यशवंत पुलाटे यांनी केले.जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर व सिंधूताई विखे पाटील सार्वजनिक वाचनालय, लोणी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक विभाग यांच्या सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत आयोजित अहिल्यानगर ग्रंथोत्सव २०२५ मधील काव्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या विचारपीठावर माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, कवी भास्कर लगड, शब्दगंध चे संस्थापक सचिव सुनील गोसावी तसेच सहाय्यक ग्रंथालय संचालक सचिन जोपळे आदी मान्यवर उपस्थित होते. शर्मिला गोसावी यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले. या काव्यसंमेलनात प्रा. डॉ. संदीप तपासे, भास्कर निर्मळ, प्रा. दादासाहेब कोते, बबनराव गिरी, संजय सुबे, वैष्णवी निर्मळ, मराठी स्वाक्षरी मोहिमेचे पुढाकार घेणारे विक्रम चव्हाण, एकनाथ औटी, प्रमोद येवले, बाळासाहेब धावणे, पोपटराव दातार, विजय डोळे आणि साहेबराव तुपे यांनी आपल्या विविधांगी काव्यरचना सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. सुनील गोसावी, भास्कर लगड यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी पार्वतीबाई गोसावी सार्वजनिक वाचनालय चे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ गोसावी, प्राचार्य डॉ. पवार, मीरा काकडे, बाबासाहेब सांबारे, अमोल इथापे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमास साहित्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शेवटी रामदास शिंदे यांनी आभार मानले.

## निधन वार्ता

### रमेश बोरूडे



**नेवासा** येथील लॉन्ड्री व्यावसायिक रमेश विठ्ठल बोरूडे (वय ६४) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले.
त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा, एक मुलगी,जावई असा परिवार आहे. नेवासा परिट समाज संघाचे पदाधिकारी सोमनाथ बोरूडे यांचे ते वडील होते.


**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME RAZIYABANO TAUFIKHUSSAIN SHAIKH(PassportNo. H0370889) ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS RAJIYA TOUFIK SHAIKH (AADHAR NO. 509213212390) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLkIC SHRIRAMPUR
PLACE: SHRIRAMPUR
DATE : 01/03/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME KARDILE SANDIP LAXMAN ( Educational Documents) ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS SANDEEP LAXMAN KARDILE (AADHAR NO. 9749 3374 7537) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLICSANGAMNER PLACE: SANGAMNER
DATE : 01/03/2026

## चैतन्य कानिफनाथ महाराज यात्रा उत्सवानिमित्त देवळाली प्रवरात किर्तन महोत्सवाचे आयोजन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** देवळाली प्रवरा येथील टाकळीमिया रोड येथे ॐ चैतन्य कानिफनाथ महाराज यात्रा उत्सवानिमित्त नवनाथ ग्रंथ पारायण सोहळा व भव्य सप्ताह कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव दि. १ मार्च ते ८ मार्च २०२६ या कालावधीत मोठ्या भक्तिभावात संपन्न होणार आहे.

या सप्ताहात दररोज सकाळी नवनाथ ग्रंथ पारायण व विविध धार्मिक विधी, तर सायंकाळी ७ ते ९ या वेळेत नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन व त्यानंतर महाप्रसाद पंगत होणार आहे.

या कालावधीत ह.भ.प. शुभम महाराज कांडेकर, निखिल महाराज बानकर, चैतन्य महाराज मापारे, सुभाष महाराज विधाटे, मधुकर महाराज पवार, बाबा महाराज मोरे, नामदेव महाराज शास्त्री, दुर्गप्रसाद महाराज तिडके आदी कीर्तनकार आपले विचार व कीर्तनसेवा सादर करणार आहेत.

रविवार दि. ८ मार्च रोजी सायंकाळी ७ ते ९ बाबानंद महाराज वीर यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसाद कार्यक्रमाने सप्ताहाची सांगता होणार आहे. या कार्यक्रमासाठी विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक ॐ चैतन्य कानिफनाथ प्रतिष्ठान, देवळाली प्रवरा यांनी केले आहे.

संपूर्ण सप्ताहात भजन, कीर्तन, प्रवचन व धार्मिक कार्यक्रमांची भक्तिमय मेजवानी अनुभवण्याची संधी भाविकांना मिळणार आहे.

## पुणेकरांना आता इटालियन फर्निचरसाठी परदेशाची ओढ नाही

### पुण्यात 'पॅपिलॉन' एक्सपिरीयन्स सेंटरचे दिमाखात उद्घाटन


**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:** जागतिक दर्जाचे डिझाईन आणि भारतीय कारागिरीचा सुरेख संगम असलेले 'पॅपिलॉन' इटालियन स्टाईल कस्टमाईज फर्निचर एक्सपिरीयन्स सेंटर आता पुणेकरांच्या सेवेत रुजू झाले आहे. श्रीरामपूर येथील नामांकित 'श्री इम्पेक्स' समूहाच्या (कुदळे बंधू) या भव्य शोरूमचा उद्घाटन सोहळा २१ फेब्रुवारी रोजी पुण्यात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते या केंद्राचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील होते. यावेळी महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती.या सोहळ्याला आमदार हेमंत ओगले, करण ससाने, आमदार बापूसाहेब पठारे, रामदासजी दाभाडे, डॉ. श्रेयसताई खांदवे, ऐश्वर्याताई पठारे, संजयजी फंड, नानासाहेब शिंदे यांसह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी विजयराव कुदळे व राजेंद्र भोंगळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.शोरूमचे संचालक अभिजीत आणि अविनाश कुदळे यांनी या संकल्पनेबद्दल माहिती दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दर्शन मुंदडा, दिगंबर फरगडे, अनिल बोरावके आणि सागर भोंगळे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी कंपनीचे संचालक अमोल कुदळे यांनी उपस्थित सर्व मान्यवर आणि ग्राहकांचे आभार मानले.

## गौतम पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात

### विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण प्रयोगांनी वेधले सर्वांचे लक्ष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोळपेवाडी**-विज्ञानाची कास धरून भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी सज्ज होण्याच्या उद्देशाने कर्मवीर शंकररावजी काळे साहेब एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित गौतम पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचा संशोधन वृत्तीचा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा उत्कृष्ट प्रत्यय आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे प्राचार्य नूर शेख यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी भारतरत्न डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका ज्योती शेलार, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक राजेंद्र आढाव आणि शाळेतील सर्व विज्ञान विषय शिक्षक प्रामुख्याने उपस्थित होते. उद्घाटन सोहळ्यानंतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कार्यान्वित प्रकल्पांची बारकाईने पाहणी केली.विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनातील समस्यांवर आधारित वैज्ञानिक उपाय शोधण्याचा प्रयत्न केला. इयत्ता पाचवी ते सातवीच्या लहान गटात साद नसिर पठाण याने तयार केलेल्या फ्री हायब्रीड इलेक्ट्रिक सर्कुलेशन जनरेटर या प्रकल्पाने प्रथम क्रमांक पटकावला. तर क्षीरसागर जय व गायकवाड सार्थक यांनी सेफ्टी ऑफ फार्मिंग अँड शेड या प्रयोगातून शेतीच्या सुरक्षेचा प्रश्न मांडत द्वितीय क्रमांक मिळवला. तृतीय क्रमांक वाघमारे जानवी व रायते गौरी यांच्या प्रयोगाला देण्यात आला.मोठ्या गटात (इयत्ता ८ वी ते ९ वी) कवडे आदेश व गारे प्रत्युष यांनी सादर केलेल्या फ्लड इंडिकेटर (पूर सूचक यंत्र) या प्रकल्पाने सर्वांचे लक्ष वेधून घेत प्रथम क्रमांक मिळवला. कचरा व्यवस्थापनावर आधारित गार्बेज कलेक्शन मशीन तयार करणारे पार्थ फोलाने,मनीष आवारे व खर्डे संचित या तिघांनी द्वितीय क्रमांक पटकावला तर फायर प्रोटेक्शन हाऊस सादर करणाऱ्या पवार विराज व महाले मानव यांना तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले.

## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि . २ मार्च २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत
१५० २४० ३३० ६-१ १४६ १२८ ११९
जोड ६०-४१-२९-३५-१६

**कल्याण**
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत
१९० २८० १८० ०-३ १२० ६७० ५३०
जोड ०६-२३-१६ ४७-३९

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत
१४९ २४८ ६८० ४-६ १२२ १५० ६००
जोड ४१-३६-२५ ७८-६९

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## द • ख • ल

### जखमी पोलिस जवानाची अखेर प्राणज्योत मावळली



**लिंपणगाव** : ड्युटीवर असताना झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेले पोलिस जवान राहुल सुनील मोटे पाटील (वय ३८) यांचे दोन वर्षांच्या प्रदीर्घ उपचारांनंतर मंगळवारी (दि. २४ फेब्रुवारी) रात्री निधन झाले. पुणे येथे कर्तव्य बजावत असताना त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. गेल्या दोन वर्षांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते; मात्र अखेर उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या दुर्दैवी घटनेमुळे श्रीगोंदा तालुक्यावर शोककळा पसरली आहे. कर्तव्यदक्ष, मनमिळाऊ आणि कामाप्रती निष्ठावान म्हणून ते पोलिस दलात ओळखले जात होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, आजी आणि दोन लहान मुले असा परिवार आहे.दिवंगत राहुल मोटे पाटील यांच्या पार्थिवावर बुधवार दि. २५ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता श्रीगोंदा येथील स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलिस दलातील अधिकारी व सहकारी, तसेच राजकीय-सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. साश्रूनयनांनी उपस्थितांनी या वीर जवानाला अखेरची श्रद्धांजली वाहिली.

### प्रहारअपंग क्रांती संघटनेच्या श्रीगोंदा तालुका अध्यक्षपदी सुनील भोसले



**श्रीगोंदा** : प्रहार अपंग क्रांती संघटनेच्या श्रीगोंदा तालुका अध्यक्षपदी सुनील भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेच्या आदेशानुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. निवडी नंतर ते बोलताना म्हणाले, जबाबदारी मोठी, अपेक्षा त्याहून मोठ्या आहेत श्रीगोंदा तालुक्यात दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांना योग्य दिशा देणे, शासकीय योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचवणे आणि अन्यायाविरुद्ध ठाम भूमिका घेणे हीच खरी कसोटी असणार आहे. त्यासाठी आहोरात्र प्रयत्नशील राहणार आहे. नवीन नेतृत्वाकडून कार्यकर्ते आणि समाज दोघांनाही ठोस कामगिरीची अपेक्षा आहे. नियुक्तीपत्रावर जिल्हाध्यक्ष अंकुश लक्ष्मणराव पोकळे, उत्तर जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे आणि जिल्हा सचिव हमीद शेख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### मराठी भाषेचा अभिमान बाळगा : परदेशी

**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल मढेवडगाव येथे आयोजित व्याख्यानमालेत निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे राज्य कार्याध्यक्ष तथा प्रसिद्ध व्याख्याते संतोष परदेशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हौसराम दांगडे होते. यावेळी बोलताना परदेशी म्हणाले, मराठी भाषा ही आपली अस्मिता आहे. मराठी साहित्यिकांनी निर्माण केलेले साहित्य हा आपला अमूल्य ठेवा आहे. त्याचे मनापासून वाचन केले पाहिजे. मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी प्रत्येक मराठी भाषिकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. मराठी ही संस्कारांची भाषा असून तिचा प्रत्येकाने अभिमान बाळगावा, असेही त्यांनी सांगितले. परदेशी यांनी यावेळी कुसुमाग्रज यांच्या कविता सादर करून विद्यार्थ्यांना साहित्याची गोडी लावली. तसेच आई-वडील व गुरुजनांचे जीवनातील महत्त्व अधोरेखित करत वडीलधाऱ्यांच्या सहवासात राहण्याचा सल्ला दिला. वाचनाची सवय लावून अधिकाधिक साहित्य अभ्यासावे, आत्मचरित्रांचे वाचन करावे. महान व्यक्तींची आत्मचरित्रे प्रेरणा देतात आणि उच्च ध्येय गाठण्यासाठी आवश्यक असलेले संस्कार घडवतात, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमास पर्यवेक्षक विलास सुलाखे, सुजाता डाके, रामदास पवार, मीनाक्षी कदम, राजेंद्र शेळके, महादेवी माने, शंकर येदलोड, वैभव काळूखे, प्रणव नलगे व मनीषा व्यवहारे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता डाके यांनी केले, तर आभार प्रदर्शन शंकर येदलोड यांनी मानले.

# सदगुरु गोदड महाराज मंदिराच्या अनधिकृत ट्रस्टचा वाद पेटला

## दुसऱ्या दिवशी आंदोलन सुरूच; प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेत घेतला आढावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : कर्जतचे ग्रामदैवत संत सदगुरु गोदड महाराज मंदिराच्या ट्रस्टमध्ये काही स्वार्थी लोकांनी पुजारी, सेवेकरी, मानकरी यासह भाविकांना अंधारात ठेवत अनधिकृतपणे दुसऱ्या ट्रस्टला मान्यता दिली असून ते तात्काळ रद्द करावे या मागणीसाठी दुसऱ्या दिवशी देखील गोदड महाराज मंदिरासमोर भजन करीत धरणे आंदोलन कायम ठेवत प्रशासनाचे लक्ष वेधले.

यावेळी कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी भेट देत आंदोलनकर्त्याशी चर्चा केली. यावेळी प्रशासकीय प्रमुख म्हणून त्यांना निवेदन देण्यात आले. प्रांताधिकारी पाटील यांना दिलेल्या निवेदनात श्री संत सदगुरु गोदड महाराज मंदिर ट्रस्टची नोंदणी १६ मार्च १९५४ साली झाली असून त्यानुसार अद्याप पर्यंत



ट्रस्टचे कामकाज सुरळीत चालू होते. मात्र कर्जत नगरपंचायत हद्दीतील काही स्वार्थी विचाराच्या लोकांनी एकत्र येत खोटे-नाटे कागदपत्रे तयार करीत धर्मदाय आयुक्त कार्यालय अहिल्यानगर यांना प्रलोभन दाखवत चुकीच्या कागदपत्राच्या आधारे बेकायदेशीर ट्रस्ट नोंदणी केली.

वास्तविक पाहता संत सदगुरु गोदड महाराज यांचे पुजारी, सेवेकरी, मानकरी यांना अंधारात ठेवत हा प्रकार करण्यात आला. यामुळे पंचक्रोशीतील भाविकांमध्ये अविश्वास निर्माण झाला असून सदरचे अनधिकृत ट्रस्ट तात्काळ बरखास्त करावे. तसेच जुने ट्रस्ट अस्तित्वात असताना व वरिष्ठ कार्यालयात सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना अहिल्यानगर येथील कनिष्ठ धर्मदाय आयुक्त यांनी आपल्या पदाचा आणि अधिकाराचा दुरुपयोग केलेला असून त्यांची निःपक्षपाती चौकशी करून कर्जतकरांना न्याय द्यावा अशी मागणी केली.

यावेळी प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी वरील आशयाचे निवेदन स्वीकारत आंदोलनकर्त्याच्या भावना धर्मादाय आयुक्त यांच्याकडे पाठवत विशेष बाबीने या प्रश्नांकडे लक्ष देत तोडगा काढण्याचा प्रयत्न करेन अशी ग्वाही दिली.

**मंदिरासमोर दुसरा फलक लावला**

आंदोलनकर्त्यांनी रविवारी गोदड महाराज मंदिर परिसरात दुसरा फलक लावत त्यावर मोडी लिपीतील दस्तावेज तसेच महाराजांच्या काळातील बक्षीसपत्र दाखवत १९५४ साली स्थापन झालेल्या जुन्या ट्रस्टचा ठोस पुरावा असल्याचा दावा केला. अशा परिस्थितीत नव्या ट्रस्टची निर्मिती नेमकी कोणत्या कायदेशीर बाबीच्या आधारावर करण्यात आली ? असा प्रश्न प्रशासनासमोर उपस्थित केला. यावेळी धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या कार्यपद्धतीवर आक्षेप नोंदवत चौकशी करण्याची मागणी केली.

# महापुरुषांच्या अवमानप्रकरणी हरजितसिंह वधवा यांची तक्रार

## मंत्रालयाकडून 'तत्काळ' दखल; मिलन बॅन्केट हॉल प्रकरण प्रशासकीय पातळीवर चौकशीला सुरुवात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : हरियाणा राज्यातील मिलन बॅन्केट हॉल येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि राणी पद्मिनी यांच्या प्रतिमांचा वापर स्वच्छतागृह दर्शक (टॉयलेट साइनबोर्ड) म्हणून करण्यात आल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणी संतापाची लाट उसळली आहे. राष्ट्रातील महान व्यक्तिमत्त्वांचा अशा प्रकारे अवमान झाल्याचा आरोप करत शहरातील सामाजिक कार्यकर्ते हरजितसिंह वधवा यांनी संबंधित प्रकरणी औपचारिक तक्रार दाखल केली आहे. माहितीनुसार, सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या व्हिडिओमध्ये संबंधित बॅन्केट हॉलमध्ये स्वच्छतागृह दर्शविण्यासाठी शिवराय आणि राणी पद्मिनी यांच्या प्रतिमा लावण्यात आल्याचे दिसत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये सोशल मीडियाद्वारे तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली होती. या प्रकरणी हरजितसिंह वधवा यांनी पुढाकार घेऊन हरियाणा पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री कार्यालय, सांस्कृतिक कार्य विभाग आणि गृह विभाग यांना ई-मेलद्वारे तक्रार नोंदविली आहे. तक्रारीत संबंधित घटनेची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यानंतर मुख्यमंत्री सचिवालय, महाराष्ट्र यांनी या तक्रारीची अधिकृत दखल घेत ती संबंधित विभागाकडे कार्यवाहीसाठी पाठविल्याची माहिती देण्यात आली. तसेच महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग यांनी तक्रार प्राप्त झाल्याची नोंद करून तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिल्याचे कळविण्यात आले आहे.

पुढील टप्प्यात महाराष्ट्र शासन गृह विभाग यांनीही सदर प्रकरण 'तत्काळ' म्हणून चिन्हांकित करून संबंधित पोलिस अधिकाऱ्यांकडे आवश्यक ती कारवाई करण्यासाठी पाठविले असल्याची माहिती समोर आली आहे.

# वांबोरी चारीच्या पाण्याची सातवड, करंजीला प्रतिक्षा

## अतिवृष्टी होऊनही पाणी टंचाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**करंजी** : मुळा धरणातून वांबोरी चारीला पाणी सोडण्यासाठी कळ दाबुन महिना झाला तरी चिचोंडी, शिराळ, कोल्हार, उदरमल,सातवड व करंजीसह डोंगराळ भागातील गावांना पाण्याचा थेंबही मिळालेला नाही. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे ऐन उन्हाळ्यात फळबागा व रब्बी पिके वाया जाण्याची भीती निर्माण झाली असून शेतकरी संतप्त झाले आहेत. पाथर्डी, नगर व राहुरी तालुक्यातील सुमारे ४५ गावांसाठी वांबोरी चारी ही 'जलसंजीवनी' मानली जाते. या योजनेतून १०२ पाझर तलाव भरण्याचे नियोजन असते.

यंदा अतिवृष्टी सारखा पाउस झाला असला तरी तलावात,बंधाऱ्यात दगड गोट्यासह गाळ साचला त्यामुळे पाण्याची साठवण कमी झाली व पाण्याची पातळी झपाट्याने घटत आहे. हक्काचे ६८० एमसीएफटी पाणी



जानेवारीत सुटणे अपेक्षित असताना एक महिने उलटूनही शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचलेले नाही. तुट फुट, कमी दाब यामुळे पाणी येण्यास विलंब होतो.मार्चपासून डाव्या, उजव्या कालव्याद्वारे आवर्तन सुरू होणार असल्याने वांबोरी चारीचे पंपिंग पुन्हा कोलमडण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली असुन प्रशासनाने या पाण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन या भागाला पाणी द्यावे अशी मागणी चेअरमन संतोषराव गरुड, राजेंद्र पाठक, अंबादास डमाळे, विठ्ठल गायकवाड, राजेंद्र गीते आदींनी तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली आहे.

विहिरींना पाणी कमी पडले आहे आणि आता फळबागांना पाणी देण्याची वेळ आली आहे. अशा वेळेस प्रशासनाने तातडीने हालचाली करून वांबोरी चारीच्या माध्यमातून भोसे तलावात पाणी सोडावे

**अशोक टेमकर ( फळबागधारक शेतकरी, भोसे )**

दुरुस्तीनंतर आता दोन्हीही पंप सुरू केले आहेत मिरी लाईनला पाणी रविवारी सुरू केले असून लवकरच करंजी सातवड लाईनला पाणी येणार आहे.

**टि.बी. गर्जे (सहाय्यक अभियंता , वांबोरी चारी )**

# सैनिक स्कूल देवदैठण येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण - येथील सैनिक स्कूलमध्ये शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या ऊसाहात साजरा करण्यात आला.

विज्ञान दिनानिमित्त शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांना विज्ञान प्रदर्शनासाठी उपक्रम बनवताना शिक्षकांनी मोलाचे मार्गदर्शन केले. विज्ञान प्रदर्शनाची थीम *इनोवेशन फॉर नेशन* अशी होती.



विज्ञान प्रदर्शनासाठी अतिथी म्हणून निवृत्त कर्नल साहेबराव शेळके , विद्याधाम प्रशालाचे विज्ञान विषयाचे शिक्षक प्रमोद रुपनर आणि लोकमतचे वार्ताहर पंकज गणवीर हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्कूलचे शिक्षक नितीकेश आवळे, सुषमा ससाणे, वर्षा शिंदे, कांचन मुठाळ, अपेक्षा घावटे आणि कविता कौठाळे तसेच शिल्पा झोडगे यांनी विशेष योगदान दिले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी सायली सुनील वीर आणि पायल नंदू कुटे यांनी केले. कर्नल साहेबराव शेळके यांनी मुलांना निसर्ग हे मोठे विज्ञान असून त्याचा उपयोग कसा करून घ्यायचा या बाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

विज्ञान प्रदर्शनातून उत्कृष्ट उपक्रम निवडून विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण केले गेले.

# सदगुरूला अनन्य भावाने शरण गेल्यास ईश्वर प्राप्ती होते : हभप योगीराज महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर** : श्रीसंत तुकाराम महाराज बिजोत्सवा निमित्त पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील अखंड हरीनाम साप्ताहास ५० वर्ष पूर्ण झाल्यामुळे, सुवर्ण महोत्सवी अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.भव्य कीर्तन सोहळ्यातील पाचव्या दिवसाचे कीर्तनपुष्प संत एकनाथ महाराजांचे वंशज,हभप योगीराज महाराज गोसावी यांनी गुंफले. यावेळी निरूपण करताना,हभप योगीराज महाराज गोसावी यांनी सद्गुरुसी शरण जाय,त्यासी ब्रम्हप्राप्ती होय.

या संत एकनाथ महाराजांच्या अभंगावर निरूपण केलें. आमदार काशिनाथ दाते यांच्या पत्नी सुमन दाते, खासदार निलेश लंके यांचे बंधू दिपक लंके, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, तालुका कार्याध्यक्ष सोमनाथ वरखडे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना महाराज म्हणाले,कसं वागावं काय कराव हे शिष्याला गुरु सांगतो. सद्गुरुचे चरण तीर्थ मस्तकाला लावायचे असते ते पवित्र असते. संसार सागरातून तरुण जाण्या साठी गुरू करावाच लागतो. गुरुचे स्थान सर्वोच्च असून,जो साधक पूर्ण भावाने सद्गुरूंना शरण जातो त्याला ब्रह्मप्राप्ती होत असते. यासाठी अन्य कोणतीही कठीण साधना किंवा उपाय करण्याची गरज नाही.

फक्त सद्गुरूंचे चरण घट्ट धरावेत म्हणजेच त्यांच्या चरणी अनन्य शरण जायला हवे असेही महाराज म्हणाले. जेव्हा एखादा साधक अहंकार सोडून सद्गुरूंच्या चरणी अनन्य भावाने शरण जातो.तेव्हा सद्गुरूच त्याला आत्मज्ञान किंवा ईश्वर प्राप्ती करून देतात.तसे गुरुविना ज्ञान मिळणे शक्यच नाही. आणि त्यांच्या कृपेनेच शिष्याला सर्वोच्च स्थिती प्राप्त होते. गुरूने शिष्याची सेवा घायची नाही.

आणि शिष्याने सेवा केल्याशिवाय राहू नये.सद्गुरूंचा आश्रय घेतला की इतर योगसाधना तप किंवा उपासनेची गरज राहत नाही. सर्व साध्य-साधनेचा अर्थ सद्गुरूंच्या चरणांमध्येच सामावलेला आहे.गुरुभक्ती हीच सर्वात मोठी साधना असून,सद्गुरूंचे चरण हेच संसाररूपी सागर पार करण्याचे साधन असल्याचेही महाराज म्हणाले. किर्तन श्रवणासाठी मोठ्या संख्येने भाविकभक्त उपस्थित होते.

# काकडे कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**एरंडगाव** : कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालय शेवगाव येथे आज २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात पार पडला .यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य संपतराव दसपुते, प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर, पर्यवेक्षक रवींद्र आगळे, प्रा .सविता पवार, प्रा. सुभाष देठे ,प्रा.सविता फाटके आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी प्रतिनिधी प्रीती तुपविहिरे हिने आपले मनोगत व्यक्त केले.

प्राध्यापक प्रतिनिधी सविता फाटके यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान दिनाचे महत्त्व सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर देशाच्या प्रगतीसाठी करावा असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. अशोक तमनर यांनी विद्यार्थ्यांनी श्रद्धा व अंधश्रद्धा यातील फरक लक्षात घ्यावा तसेच विद्यार्थ्यांनी संशोधन वृत्ती जोपासावी असे आवाहन केले. यावेळी विज्ञान दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांची भारतातील वैज्ञानिक संस्थांची नावे देऊन सहा गटांमध्ये विभागणी करून प्रश्नमंजुषा घेण्यात आली. यामध्ये आय.सी.एम.आर. या ग्रुपच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्ञानेश्वर लबडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. जरीना शेख यांनी तर समारोप प्रा. पल्लवी ढोले यांनी केला.

## भक्तीचा मळा फुलणार!

# भोकर ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडीचे ५ मार्चला प्रस्थान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भोकर** : श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथून दरवर्षीप्रमाणे यंदाही नाथषष्ठीच्या निमित्ताने निघणाऱ्या भव्य पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. ५ मार्च रोजी सकाळी श्रीक्षेत्र भोकर येथील ब्रह्मलीन सद्गुरू लहरीनंद महाराज यांच्या मंदिरासमोरून या दिंडीचे पैठणकडे प्रस्थान होईल. त्र्यंबकेश्वर येथील महंत त्र्यंबकेश्वरानंद सरस्वती महाराज यांच्या प्रेरणेने सुरू होणारा हा दिंडी सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडणार आहे. ही दिंडी भोकरसह घुमनदेव, मुठेवाडगाव, खोकर, वडाळा महादेव, टाकळीभान आणि नाशिक जिल्ह्यातील विविध गावांतील भाविकांच्या सहभागाने मजल-दरमजल करत पुढे जाईल. विठ्ठल-रखुमाई आणि शांतिब्रह्म एकनाथ महाराजांच्या जयघोषात रविवार, दि. ८ मार्च रोजी दिंडी श्रीक्षेत्र पैठण येथे दाखल होईल. पैठण येथील 'आशिर्वाद मंगल कार्यालय' येथे दिंडीचा मुक्काम असेल. सोमवार, दि. ९ मार्च रोजी दर्शन सोहळा पार पडेल. त्यानंतर मंगळवार, दि. १० मार्च रोजी काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने दिंडीची सांगता होईल. विशेष म्हणजे, यंदाच्या महाप्रसादाचे अन्नदाते म्हणून भोकरचे माजी उपसरपंच नामदेव चव्हाण सेवा बजावणार आहेत.

# स्वस्तात सोन्याचे आमिष; पुण्याच्या तरुणाला लुटले

## १२ जणांचा टोळी हल्ला, ५.३० लाखांचा ऐवज लंपास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : २५० ग्रॅम सोनं, फक्त ५ लाखांत! या गोड आमिषाने एका १९ वर्षीय तरुणाला जाळ्यात ओढून तब्बल १२ जणांच्या टोळीने भरदिवसा हल्ला करून ५ लाख ३० हजार ६०० रुपयांचा ऐवज लुटल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

याप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीनुसार, अविनाश दिनकर शिंदे (रा. कडवाचिवाडी, ता. खेड, जि. पुणे) याला काही दिवसांपूर्वी कारागृहात ओळख झालेल्या व्यक्तीने स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवलं. त्यानुसार ५ लाखांत २५० ग्रॅम - एवढं ऐकताच व्यवहार पक्का झाला.

विश्वास बसावा म्हणून आधी अंगठी देऊन व्यवहाराची चाचणीही घेण्यात आली. ठरल्याप्रमाणे २८ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारास कोळगाव शिवारात भेट ठरली. तक्रारदार आणि त्याचा मित्र रोख रक्कम घेऊन पोहोचले. मात्र, चित्रपटातल्या सीनसारखं अचानक १० ते १२ अनोळखी इसमांनी घेराव घातला. मारहाण करत बॅग हिसकावून घेतली आणि मोबाईल, पाकीट, ओळखपत्रे, एटीएम कार्डे असा सर्व ऐवज लंपास केला.त्यामध्ये ४,९८,५०० (५०० रुपयांच्या ९९७ नोटा),१,५०० (१०० रुपयांच्या १५ नोटा,मोबाईल हँडसेट, पाकीट व ओळखपत्रे असा एकूण ५,३०,६०० रु ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे हल्लेखोरांमध्ये २० ते ४५ वयोगटातील पुरुष आणि एक महिला सहभागी असल्याचे तक्रारीत नमूद आहे. सर्वांनी तक्रारदारांना धमकावून घटनास्थळावरून पळ काढला असून या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून स्वस्त सोनं या आमिषाखाली फसवणूक व दरोड्याचे प्रकार वाढत असल्याची चर्चा रंगली आहे. व्यवहारात संशयास्पद व्यक्तींवर विश्वास ठेवण्याची किंमत या तरुणाला चुकवावी लागली.

बेलवंडी पोलीस अधिक तपास करत असून आरोपींचा शोध सुरू आहे.

**हा फंडा दरोडेखोरांचाच**

श्रीगोंदा यापूर्वी अश्या अनेक घटना घडल्या असून जनतेने सावधान! होणे गरजेचे आहे बाजारभावापेक्षा स्वस्त सोनं म्हणजे लाल झेंडा. जास्त फायदा, कमी किंमत हा फॉर्म्युला सहसा गुन्हेगारांचाच असतो, व्यापाऱ्यांचा नाही! हे जनतेने समजून घेण्याची खरी गरज आहे.

# राहुरी महाविद्यालयासाठी चार कोटींची अद्ययावत इमारत बांधणार : अरुण तनपुरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : चालू वर्षात राहूरी महाविद्यालयास ५० वर्षे पूर्ण होत असून, तत्पूर्वी महाविद्यालयास कुठेही कर्ज न घेता ४ कोटी रुपयांची अद्ययावत इमारत बांधण्यात येणार असल्याचे डॉ. तनपुरे कारखान्याचे चेअरमन व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुण तनपुरे यांनी सांगितले. तसेच आगामी शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात विविध नव नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असून, त्यात एम.सी.एस. हा व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्याची घोषणा यावेळी त्यांनी केली.

लोकनेते रामदास पाटील धुमाळ महाविद्यालय येथे शिवजयंती महोत्सव आणि 'आरंभ' युवा महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. २३ फेब्रुवारीपासून महाविद्यालयात



सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रीडा स्पर्धांचा उत्साहपूर्ण प्रारंभ झाला. या निमित्त गुणवंत व स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा, स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व संचालकांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कोळसे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या डॉ. अनिता वेताळ अंत्रे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या झाल्याबद्दल अध्यक्ष अरुण तनपुरे यांनी सर्वांचे अभिनंदन केले. यावेळी संचालक हर्ष तनपुरे, संचालक रावसाहेब चाचा तनपुरे, किसनराव जवरे, भास्कर ढोकणे, अरुण ढुस, प्रमोद तारडे, सुनील मोरे, अरुण ठोकळे, अशोक उर्हे, जनार्धन गाडे, कृष्णा मुसमाडे, भारत वारुळे, ज्ञानेश्वर खुळे, प्रकाश भुजाडी, ज्ञानेश्वर पवार, अशोक तमनर, संचालिका वैशाली तारडे, सपना भुजाडी, मीना करपे, जनाबाई सोनवणे, सुरेश करपे, सुरेश निमसे, नगरसेवक डॉ. संतोष उदावंत, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र गोसावी, उपप्राचार्या मंजाबापू उर्हे, अधीक्षक गणेश देशमुख आदींसह प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. संदीप इरुळे यांनी, तर आभार डॉ. रंगनाथ खिलारी यांनी मानले.

द • ख • ल

## वाडेबोल्हाईत अष्टविनायक यात्रेला प्रतिसाद

### सविता गावडे यांचा विकासाचा संकल्प

**वाघोली, पुणे :** वाडेबोल्हाई (ता. हवेली) येथे ग्रामस्थांसाठी आयोजित अष्टविनायक दर्शन यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. माजी उपसरपंच व सरपंचपदाच्या इच्छुक उमेदवार सविता श्रीकांत गावडे यांच्या पुढाकारातून दि. २६ व २७ फेब्रुवारी रोजी ही मोफत यात्रा पार पडली. यात्रेचे प्रस्थान वाडेबोल्हाई क्रिकेट मैदानावरून ट्रॅव्हल्स बसद्वारे करण्यात आले. हजारो ग्रामस्थांनी सहभाग नोंदवत परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण केले. भाविकांसाठी बस, भोजन व निवासाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी कुशाबा सिताराम गावडे, भाऊसाहेब वारघडे, विद्याधर गावडे, विठ्ठल विष्णु गावडे, विजय पायगुडे, अशोक इंगळे, मल्हारी महाराज गावडे आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमातून सेवा, समर्पण व थेट संवादाच्या माध्यमातून वाडेबोल्हाईचा सर्वांगीण विकास साधण्याचा संकल्प सविता गावडे यांनी व्यक्त केला. नियोजनबद्ध आयोजनामुळे त्यांच्या कार्यशैलीचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.




## मराठी भाषा गौरव दिनी 'मोडीलिपी मंथन' ग्रंथाचे प्रकाशन

**मुंबई :** मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ज्येष्ठ मोडीलिपी अभ्यासक भाऊराव घाडीगावकर यांच्या 'मोडीलिपी मंथन' या ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार व प्राध्यापक हेमंत सुधाकर सामंत करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. भास्कर धाटावकर, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ पुणे चे कार्यकारिणी सदस्य अभय जगताप, मोडीलिपी अभ्यासक सुनील कदम, कांचन कराई, रामकृष्ण बुटे, अरविंद काटकधोंड, अमित घाटये आदी तज्ज्ञ उपस्थित होते. मोडीलिपी कट्टा यांच्यावतीने आयोजित कार्यक्रमाचे पुस्तक प्रकाशन व मोडीलिपी साहित्य प्रदर्शन असे स्वरूप या कार्यक्रमाचे होते. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय येथील प्रा. सुरेंद्र गावस्कर सभागृहात उत्साहाने पार पडलेल्या या कार्यक्रमात हेमंत सामंत आपल्या भाषणात म्हणाले की, भाऊ घाडीगावकर हे या क्षेत्रातील द्रोणाचार्य आहेत. हजारो मोडी कागदपत्रे त्यांनी हाताळली आणि वाचली आहेत. त्यांच्या हस्ताक्षरात साकारलेला हा ग्रंथ मोडीलिपी शिकणाऱ्या व सराव करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व सभागृह सजावट डॉ. तेजस लोखंडे यांनी मोडीमय शैलीत करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. मोडीलिपी कट्टा मंडळ चे पदाधिकारी प्रकाश डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली कमलाकर पांचाळ, किशोर सावंत, चंद्रकांत गुळंबे, विनोदकुमार टेकवडे, डॉ. उर्मिला टेकवडे, अनिल धुरी आणि रवी गावडे यांनी कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन केले.

## डबलट्री बाय हिल्टनकडून शेतकरी कन्यांना साहित्य भेट

**वाघोली (पुणे :** डबलट्री बाय हिल्टन यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत भूमी फाउंडेशनच्या सावित्रीबाई शेतकरी कन्या निवासी प्रकल्पातील मुलींना दूरचित्रवाणी संच व अत्यावश्यक साहित्य भेट देण्यात आले. प्रकल्प व्यवस्थापिका अध्यापिका अनिता पवार यांनी सांगितले की, या सहकार्यामुळे निवासी गरजू शेतकरी मुलींना शैक्षणिक व माहितीपर कार्यक्रमांसह करमणुकीच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी हॉटेल व्यवस्थापनाचे आभार मानले. या उपक्रमामुळे मुलींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून समाजातील दानशूर व्यक्ती व संस्थांनी पुढे येऊन सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. कैलास पवार यांनी केले.




## यंदा ईद साध्या पद्धतीने साजरी अजितदादा पवारांच्या निधनामुळे बारामतीत शोकभावना

**मती :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी विमान अपघातात दुर्दैवी निधन झाल्याने बारामतीसह राज्यभर शोककळा पसरली आहे. या दु:खद प्रसंगी सर्व समाज पवार कुटुंबियांच्या पाठीशी एकदिलाने उभा राहत मानवता आणि शांततेचा संदेश देताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर बारामती शहरातील मुस्लिम समाजाने यावर्षी ईदचा पवित्र सण साध्या, शांत आणि संयमी पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. चईद दरवर्षी उत्साहात साजरी होईल; मात्र अजित पवार पुन्हा कधीच येणार नाहीत, या भावनेतून समाजाने फटाक्यांची आतषबाजी, डीजे, ईद मिलन सोहळे, फ्लेक्स तसेच सार्वजनिक उत्सवी कार्यक्रम टाळण्याचे एकमताने ठरवले आहे.अजित पवार हे सर्व समाजासाठी प्रेरणास्थान होते. विकासाभिमुख दृष्टीकोनातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केले. सर्व धर्मीयांना समानतेने साथ देत त्यांनी बारामती शहराला एक कुटुंब म्हणून जपले.मुस्लिम समाजाशी त्यांचे विशेष आत्मीय नाते होते, जे विसरणे अशक्य असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य गमावल्यासारखे दु:ख संपूर्ण बारामतीला झाले असून, ईद साध्या पद्धतीने साजरी करण्याचा निर्णय हा सामाजिक बांधिलकी व एकात्मतेचा संदेश देणारा असल्याचे समाजबांधवांनी सांगितले आहे.या निर्णयातून बारामती शहराने पुन्हा एकदा हिंदू-मुस्लिम ऐक्याची परंपरा जपत मानवतेचा आदर्श समाजापुढे ठेवला आहे.

### ज्वारी काढणीस सुरुवात

# दिवे परिसरात ज्वारी काढणीला मजुरांची टंचाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**दिवे, सासवड :** परिसरात सध्या ज्वारी काढणीला वेग आला आहे. परिसरात जनावरांच्या सुक्या चाऱ्यासाठी व धान्यासाठी मोठ्या प्रमाणात ज्वारीची पेरणी केली जाते. यावर्षी जूनमध्ये पाऊस चांगला झाला, मात्र नंतर पावसाने पाठ फिरवली, त्यामुळे पुरेशा पाण्याअभावी आणि पक्ष्यांमुळे धान्य उत्पादनात घट झाली आहे.

शेतकऱ्यांना ज्वारी काढणीसाठी पुरषांना ८०० आणि महिलांना ४०० रूपये मजुरी द्यावी लागते, तरी धान्य उत्पादनाचा फायदा फारसा होत नाही. कडबा विकणारा आणि खरेदी करणारा दोघांनाही ज्वारी परवडत नाही. परिणामी, दिवे परिसरात ज्वारी काढणीसाठी मजुरांची टंचाई जाणवत आहे. काही ठिकाणी दिवसा आणि रात्रीही काढणीचे काम सुरू आहे.

एकरभर ज्वारी काढणीसाठी कणसे कापणे, पेंढ्या बांधणे, कणसे गोळा करणे यांसारखी कामे करावी लागतात. यामध्ये शेतकऱ्यांचा खर्च जवळपास ८-१० हजार रूपयांपर्यंत पोहोचतो.शेतकरी परसराम झेंडे यांनी सांगितले की, सुरवातीला यावर्षी ज्वारीचे पीक चांगले आले होते, मात्र नंतरच्या काळात जेव्हा पाण्याची गरज होती, तेव्हा पावसाने पाठ फिरवली. परिणामी ज्वारीला उतार कमी पडला आहे.पूर्वी ज्वारी काढणी मुख्यत: रात्री केली जात असे आणि रात्रीच्या शांततेत भलरि सुमधुर आवाजात ऐकायला मिळत असे. मात्र, काळाच्या ओघात भलरि हद्दपार झाली आहे, असेही झेंडे यांनी सांगितले.



## ४ लाखांचे मोबाईल नागरिकांना परत

### माळेगाव पोलिसांची कामगिरी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर :** पुणे ग्रामीण जिल्ह्यातील नागरिकांचे हरविलेले मौल्यवान मोबाईल फोन शोधून ते मूळ मालकांच्या ताब्यात देण्याची उल्लेखनीय कामगिरी माळेगाव पोलीस ठाण्याने केली आहे. मा. पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

माळेगाव पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या हरविलेल्या मोबाईल संदर्भातील तक्रारींचे अवलोकन करुन स.पो.नि. सचिन लोखंडे, प्रभारी अधिकारी, माळेगाव पोलीस ठाणे यांनी गोपनीय शाखेचे पोलीस नाईक ज्ञानेश्वर सानप यांना तांत्रिक विश्लेषणाद्वारे मोबाईलचा शोध घेण्याची जबाबदारी दिली होती. त्यानुसार महाराष्ट्रातील विविध ठिकाणांहून एकूण १८ मोबाईलचा शोध घेण्यात आला.

यामध्ये बारामती तालुक्यातील सांगवी, माळेगाव बु., रामनगर, जळगाव सुपे, पेडगाव, कुतवळवाडी, शिवनगर, कांबळेश्वर, ढाकाळे आदी भागांतील नागरिकांचे विविध कंपनीचे मोबाईल समाविष्ट असून त्यांची एकूण किंमत सुमारे ४ लाख ११ हजार रूपये इतकी आहे. सदरचे सर्व मोबाईल आज शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी तक्रार निवारण दिनानिमित्त मूळ मालकांना परत देण्यात आले.ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.विशेष बाब म्हणजे, माळेगाव पोलीस ठाणे निर्मितीपासून पोलीस नाईक ज्ञानेश्वर सानप यांनी आतापर्यंत एकूण २० लाख २२ हजार रुपये किंमतीचे १०७ मोबाईल शोधून नागरिकांना परत केले आहेत. त्यामुळे मोबाईल मालकांनी आनंद व्यक्त केला असून परिसरातील नागरिकांकडून माळेगाव पोलीस ठाण्याच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## मराठा उद्योजक बिझनेस एक्स्पोला मंत्री विखे पाटील यांची भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** मराठा उद्योगजक असोसिएशनच्या वतीने आयोजित बिझनेस एक्स्पोला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. मराठा समाजातील युवकांना उद्योग क्षेत्रात सक्षम व आत्मनिर्भर बनविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

मंत्री विखे पाटील यांनी एक्स्पोमधील विविध स्टॉलना भेट देत उत्पादन व निर्मिती क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती घेतली.नव्या तंत्रज्ञानाचा वापर, स्टार्टअप्सच्या कल्पना तसेच बाजारपेठेतील संधी यांचा त्यांनी आढावा घेतला. उद्योजकांनी सादर केलेल्या नवकल्पनांचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे उद्योग क्षेत्राला चालना मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

एक्स्पोला उद्योजकांकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता राज्यात महायुती सरकारच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रासाठी निर्माण होत असलेल्या सकारात्मक वातावरणाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवत असल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. उद्योगस्नेही धोरणे, गुंतवणुकीस पोषक वातावरण आणि पायाभूत सुविधांना दिलेले प्राधान्य यामुळे महाराष्ट्र राज्य उद्योग




गुंतवणुकीसाठी महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून उदयास येत असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मराठा समाजातील युवकांनी नोकरी शोधणारे न राहता नोकरी देणारे बनावे, हा काळाचा संदेश असल्याचे सांगून कौशल्य विकास, उद्योगासाठी आवश्यक भांडवल व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सारथी संस्थेच्या माध्यमातून युवकांना शिक्षण, प्रशिक्षण व उद्योग मार्गदर्शन दिले जात असून औद्योगिक व सेवा क्षेत्रासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करण्याच्या दृष्टीने उद्योजक संघटनांशी समन्वय ठेवून प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याच्या सूचना नुकत्याच झालेल्या बैठकीत दिल्याची माहितीही त्यांनी दिली.

# डिंभे धरणातून उजव्या कालव्याला पाणीशेतकऱ्यांना दिलासा

पूर्व आंबेगावात उन्हाची तीव्रता वाढल्याने शेतीच्या पाण्याबरोबर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला होता. शेतकऱ्यांच्या वतीने माजी मंत्री आमदार वळसे पाटील यांच्याकडे पाणी सोडण्याची मागणी केली होती. उजव्या कालव्याला पाणी सोडल्यामुळे पाणीटंचाईच्या काळात शेती पिकांना दिलासा मिळणार आहे.
अनिल वाळुंज, माजी अध्यक्ष, खरेदी-विक्री संघ, आंबेगाव



जारकरवाडी ( ता. आंबेगाव ) येथे उजव्या कालव्याला आलेले पाणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** डिंभे धरण (हुतात्मा बाबू गेणू जलाशय) येथून उजव्या कालव्याला पाणी सोडण्यात आल्याने आंबेगाव व शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. जलसंपदा विभागाने शेतकऱ्यांनी पाणी जपून व नियोजनबद्ध वापरावे, असे आवाहन केले आहे.

कुकडी प्रकल्पांतर्गत सोडण्यात आलेल्या या पाण्याचा फायदा सुमारे ६० गावांतील शेती पिकांना होणार आहे. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. उन्हाळी नगदी पिकांसह उसाला पाण्याची तीव्र गरज भासत होती. काही ठिकाणी पिके कोमेजण्यास सुरुवात झाली होती.

उजव्या कालव्याला नियमित पाणीपुरवठा सुरू झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, परिसरातील आर्थिक घडामोडींना चालना मिळणार आहे. जलसंपदा विभागाने उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून सुयोग्य वापर करण्याचे आवाहन केले आहे.

## जेजुरी शहर राष्ट्रवादी तर्फे जाणाई देवी यात्रेसाठी मोफत बस सेवा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** जेजुरी शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने बुधवारी (ता.२५ फेब्रुवारी) रोजी निवकने (जि. सातारा) येथील जानाई देवी यात्रेसाठी मोफत बससेवेचे आयोजन करण्यात आले होते. श्री क्षेत्र जेजुरी ते निवकने या मार्गावर जेजुरी शहरातील एकूण १० प्रभागांतून ११ बसची सोय करण्यात आली होती. या उपक्रमाला जेजुरीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या बससेवेच्या माध्यमातून जेजुरी परिसरातील ५५० हून अधिक महिलांनी निवकने येथील जानाई देवी मंदिर येथे जात जानाई देवीचे दर्शन घेतले. महिलांसाठी सुरक्षित व सोयीस्कर प्रवासाची व्यवस्था करण्यात आल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

यावेळी महिलांसाठी नाष्टा, पाणी आणि जेवणाची सोय देखील करण्यात आली होती.या उपक्रमाचे नियोजन नगराध्यक्ष जयदीप बारभाई, उपनगराध्यक्ष गणेश निकुडे ,नगरसेवक योगेश जगताप,माजी नगरसेवक दादा उबाळे, सुशील राऊत तसेच जेजुरीतील १० प्रभागातील नगरसेवक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. प्रवासादरम्यान सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

धार्मिक व सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून भविष्यातही अशा सेवा राबविण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.




# पुरंदरमध्ये ७ मार्च रोजी 'महाराजस्व समाधान शिबिर'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे/सासवड :** शासनाच्या 'प्रशासन लोकांच्या दारी' या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी पुरंदर तालुक्यात 'श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत विशेष समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शनिवार, ७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता वाघापूर येथील श्री भैरवनाथ मंदिर येथे संपन्न होणार असल्याची माहिती महसूल प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

उपविभागीय अधिकारी कार्यालय पुरंदर व तहसील कार्यालय पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरामुळे कुंभारवळण आणि राजेवाडी महसूल मंडळातील शेतकरी व ग्रामस्थांना आपल्या विविध कामांसाठी सरकारी कचेऱ्यांचे उंबरठे झिजवण्यापासून मोठा दिलासा मिळणार आहे.

**एकाच छताखाली मिळणार 'या' महत्त्वपूर्ण सेवा:**
या शिबिरामध्ये विविध विभागांचे स्टॉल्स लावले जाणार असून, खालील सेवांचा लाभ नागरिकांना घेता येईल

**महसूल व भूमी अभिलेख:**
प्रलंबित फेरफार नोंदी, सातबारा उताऱ्यामधील नावांच्या चुकांची दुरुस्ती, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा आणि ८-अ उताऱ्यांचे थेट वाटप. तसेच तुकडे बंदी नियमितीकरण आणि वर्ग-२ जमिनींचे वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्याच्या प्रक्रियेला गती दिली जाईल.

**दाखले व प्रमाणपत्रे:**
लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत आवश्यक असणारे जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर, उत्पन्न दाखला, रहिवास व अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्रांचे संकलन व वाटप केले जाईल.

**सामाजिक सुरक्षा योजना:**
संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी पेन्शन योजनेच्या लाभार्थ्यांचे अर्ज निकाली काढले जातील.

**डिजिटल नोंदणी (एक खिडकी योजना):**
शेतीशी संबंधित अत्यंत महत्त्वाची ॲग्रिस्टॅग नोंदणी, पीएम किसान नवीन नोंदणी आणि प्रलंबित ई-केवायसी ची कामे या शिबिरात पूर्ण केली जातील.

**शेतकऱ्यांच्या समस्यांना प्राधान्य:**
भूसंपादन आणि अकृषिक जमिनींच्या संदर्भातील 'कमी-जास्त पत्रक' तयार करणे, तसेच अकृषिक तरतुदींनुसार सुधारित अधिमूल्य वसूल करून प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यामुळे परिसरातील शेतकरी वर्गाचा वेळ आणि पैसा दोन्हीची बचत होणार आहे.

**प्रशासकीय आवाहन:**
''कुंभारवळण आणि राजेवाडी परिसरातील सर्व शेतकरी बांधव, भगिनी आणि तरुणांनी या संधीचा लाभ घेऊन आपली प्रलंबित प्रशासकीय कामे पूर्ण करून घ्यावीत. प्रशासनाचे अधिकारी स्वतः तुमच्या दारी येत असून, या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा,'' असे आवाहन महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## साक्षात देवीस्नान सोहळ्याने धन्य झाली निरामाई

### ऐतिहासिक पुलावरून शेकडो वर्षांची जानाई परंपरा परतली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुरंदर :** जयाद्री ते सह्याद्री' या श्री जानाईदेवी शक्तिपीठ जेजुरी आयोजित पायी अन्नदान सोहळ्याचा समारोप निरा नदीतील पारंपरिक देवीस्नान विधीने झाला. निवकणे पाटण येथे सुमारे १३०० मीटर उंच डोंगरमाथ्यावर निसर्गपूजा व धार्मिक विधी संपन्न झाल्यानंतर सुमारे दीडशे किलोमीटरचा पायी प्रवास पूर्ण करत पालखी परतीच्या मार्गावर आली.

परतीच्या प्रवासात पवित्र मानल्या जाणाऱ्या निरा नदीच्या जलाशयात देवी प्रतिमेचा विधीपूर्वक स्नान सोहळा पार पडला. शेकडो वर्षांची परंपरा जपत हा सोहळा ऐतिहासिक पुलावरूनच पार पडतो, हीच या परंपरेची



वैशिष्ट्यपूर्ण ओळख मानली जाते.

देवीस्नानानंतर पालखी जेजुरीकडे रवाना झाली असून शिमगा सणाच्या दिवशी देवी पुन्हा शक्तिपीठात स्थानबद्ध होते. या संदर्भात संत नागूमाळी यांच्या वंशज नागनाथ झगडे यांनी सांगितले की, शेकडो वर्षांची ही परंपरा आजही अखंड सुरू आहे आणि भाविकांचा उत्साह वर्षानुवर्षे वाढत आहे.

दरम्यान, निरा नदीवरील पवित्र ऐतिहासिक पूल कायमस्वरूपी जतन करण्यात यावा, तो पाडू नये, अशी मागणी अन्नदान पालखी सोहळ्याचे प्रमुख संस्थापक राजेंद्र बारभाई यांनी केली. हा पूल धर्म आणि परंपरेला जोडणारा पौराणिक दुवा आहे. भाविकांच्या श्रद्धेशी निगडित असलेल्या या वारशाचे संवर्धन होणे गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. धार्मिक श्रद्धा, निसर्गपूजा आणि परंपरेचा संगम असलेल्या या सोहळ्यामुळे परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

## पुणे जिल्ह्यात ३,000 विद्यार्थ्यांचा विज्ञान महासंगम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे, सुपे :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त पुणे जिल्हा परिषद आणि प्रमुख वैज्ञानिक संस्था यांच्यातील सहकार्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी विज्ञानाचे अनुभवसत्र आयोजित करण्यात आले. जिल्ह्यातील ५० हून अधिक शाळांमधील ३,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी आयुका आणि आयसर पुणे येथे कार्यक्रमात सहभाग नोंदवत विज्ञानाचा थरार अनुभवला.

**आयुका: खगोलशास्त्राचा अनुभव:**
आयुकामध्ये १,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी 'ओपन डे'मध्ये लिगो (गुरुत्वीय लहरी), अर्थ पेंडुलम आणि इस्रोच्या मोहिमांचे मॉडेल्स पाहिले. व्याख्याने, प्रात्यक्षिके आणि प्रदर्शनांच्या माध्यमातून अवकाशातील गुपिते उलगडली.



कार्यक्रमाचा समारोप सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या मैदानावर भव्य आकाश निरीक्षण सत्राने झाला.

**भविष्यातील योजना :**
मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितले की, ग्रामीण शाळांमध्ये आधुनिक विज्ञान आणि खगोलशास्त्र प्रयोगशाळा उभारल्या जातील, तसेच इस्रो आणि नासा भेटींचे आयोजन केले जाईल. जिल्हा शिक्षण अधिकारी भाऊसाहेब कारेकर आणि संजय नाईकडे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांची पारदर्शक निवड करून त्यांना आंतरराष्ट्रीय अंतराळ संस्थांच्या भेटीसाठी पाठवण्याची रूपरेषा मांडली. 'पुणे मॉडेल स्कूल' संकल्पनेत ग्रामीण व शहरी शिक्षणातील दरी कमी करणे हे उद्दिष्ट आहे.

**पॉइंटर**

**= आयसर: विज्ञानातील महिला आणि डढएच् प्रेरणा**
आयसर पुणे येथे विज्ञानातील महिला: विकसित भारत उत्प्रेरक या संकल्पनेवर जिल्हास्तरीय कार्यक्रम पार पडला. २,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी शास्त्रज्ञांशी संवाद साधला.

**= पद्मश्री अरविंद गुप्ता यांचे ''छोटी खेळणी – मोठे विज्ञान'' सत्र विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले.**

= झेडपी शाळा कोरेगाव बुद्रुक (विज्ञान व गेमिंग) आणि झेडपी शाळा बोतरवाडी (वायू प्रदूषण कमी करणे) यांच्या प्रकल्पांची अंतिम स्टेम प्रदर्शनासाठी निवड झाली. विज्ञान प्रदर्शन पहाताना मान्यवर

# सैनिक कल्याण मंडळातील 'त्या' घोटाळ्याची आता उच्चस्तरीय चौकशी

## अहिल्यानगरसह ७ जिल्ह्यांचे धाबे दणाणले



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राज्यातील माजी सैनिकांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या जिल्हा सैनिक कल्याण मंडळांमध्ये गेल्या पाच वर्षांत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे धक्कादायक वृत्त समोर आले आहे. यामध्ये अहिल्यानगर जिल्हा सैनिक कल्याण मंडळाचाही समावेश असून, या कथित घोटाळ्याच्या सखोल चौकशीसाठी राज्य शासनाने आता तीन सदस्यीय उच्चस्तरीय समितीची नियुक्ती केली आहे.

पाच वर्षांतील व्यवहारांचे होणार 'ऑडिट' राज्य शासनाने नियुक्त केलेली ही समिती सन २०२०-२१ ते २०२५-२६ या पाच वर्षांच्या कालावधीतील सर्व आर्थिक व्यवहारांची कसून तपासणी करणार आहे. निवृत्त उपसंचालक (कोषागार) अशोक जोशी यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत संजीव मुळे आणि गिरीश दयाळ यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. अहिल्यानगरसह पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, वर्धा, बुलडाणा आणि ठाणे या सात जिल्ह्यांच्या कारभारावर आता चौकशीची टांगती तलवार आहे.

शासनाने नेमलेल्या समितीला आपला सत्यशोधन अहवाल येत्या दोन महिन्यांत सादर करण्याचे कडक निर्देश दिले आहेत. या कालावधीत अहिल्यानगर कार्यालयातील कागदपत्रांची पडताळणी केली जाणार असून, दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत.

या उच्चस्तरीय चौकशीच्या निर्णयामुळे जिल्हा सैनिक कल्याण मंडळातील संबंधित अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. माजी सैनिकांच्या हक्काच्या निधीवर डल्ला मारणाऱ्यांची नावे आता समोर येणार असल्याने जिल्हाभरातील माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांचे या चौकशीकडे लक्ष लागले आहे.

### अहिल्यानगरमधील 'या' बाबींची होणार चौकशी

* माजी सैनिक मेळावे: मेळाव्यांच्या नावाखाली झालेला खर्च आणि प्रत्यक्ष लाभ.
* साहित्य खरेदी : कार्यालयीन व कल्याणकारी कामांसाठी झालेल्या साहित्य खरेदीतील पारदर्शकता.
* भत्त्यांचा गैरवापर : काही अधिकाऱ्यांनी नियमबाह्य पद्धतीने घेतलेला 'दुहेरी महागाई भत्ता'.
* निधीचा विनियोग : विशेष निधी, कल्याणकारी निधी आणि प्रोत्साहन निधीमध्ये झालेली कथित अफरातफर.

द•ख•ल

## योगविद्याधामतर्फे विज्ञान दिनानिमित्त 'योगामागचे विज्ञान' परिसंवाद

**नगर :** विज्ञान दिनानिमित्त योगविद्याधामतर्फे 'योगामागचे विज्ञान' या विषयावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास भामरे व जयंत क्षीरसागर सर अध्यक्षस्थानी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संस्थापक सदस्या वैशाली एकबोटे यांच्या योग गीताने झाली. संस्थापक सदस्य दत्ताजी दिकोंडा यांनी प्रास्ताविक केले. परिसंवादात विविध मान्यवरांनी योग व विज्ञान यांतील परस्परसंबंध उलगडून सांगितले. डॉ. विश्वनाथ काळे यांनी 'उपनिषदामागचे विज्ञान' या विषयावर व्याख्यान देत प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानामधील वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट केला. त्यांनी उपनिषदांतील संकल्पना, मानवी चेतना व निसर्गातील नियम यांचा आधुनिक विज्ञानाशी असलेला संबंध सोप्या उदाहरणांद्वारे मांडला. आणि गोष्टीच्या माध्यमातून दैनंदिन जीवनात उपनिषदाचे उपयोजन सांगितले.तसेच पूनम वच्छातानी यांनी 'चक्र व विज्ञान' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी मानवी शरीरातील ऊर्जा केंद्रे, त्यांचा मानसिक व शारीरिक आरोग्यावर होणारा परिणाम तसेच त्यामागील वैज्ञानिक आधार याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच चक्रांच्या अभ्यासाचा त्या त्या स्थानी होणाऱ्या विकार मुक्तीवर कसा परिणाम होतो हे स्पष्ट केले. त्यानंतर दत्ता दिकोंडा यांनी पतंजली योग दर्शनातील योग सूत्र विज्ञाननिष्ठ कशी आहेत हे अर्थासह समजून सांगितले. या परिसंवादाला विद्यार्थ्यांसह योगप्रेमींचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

## कांद्याच्या भावाचा वांदा झाल्याने शेतकरी चिंताक्रांत!

**ढोरजळगांव :** दिवसेंदिवस कांद्याचे प्रति क्विंटलचे दर कोसळत चालल्यामूळे कांदा उत्पादक शेतकऱ्यामध्ये सध्या प्रचंड असंतोष पसरला आहे त्यामुळे कांद्याला मिळणाऱ्या अत्यंत कमी दरामुळे शेतकरी मात्र चांगलाच हवालदिल झाल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांचे अर्थकारण या कांदा पिकांवर अवलंबून राहत असतांना मात्र अशातच कांदा पिकाला गेल्या काही महिन्यांपासून अत्यल्प भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप निर्माण झालेला आहे कांद्याचे प्रति क्विंटलचे दर आता कोसळत चालल्यामूळे नगर जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या हवालदिल झाल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रात बहुतांशी ठिकाणी कांदा पीक असून या कांदा पिकाचा भाव सध्या चार ते पाच रुपये किलो दर झालेला असल्यामुळे शेतकऱ्यांनी आपला कांदा बाजारात न आणता केवळ भावाची हालचाल पाहण्यासाठी शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात भावाची हालचाल पाहतांना दिसून येत आहे कांदा पिकाच्या या भावामुळे शेतकरी चांगलाच संकटात सापडला असून शेतकरी संघटना व शेतकरी आता कांदा भावासाठी आंदोलन छेडण्याच्या तयारीत आसल्याचे दिसून येत आहे.

## बाजार भाव घसरल्याने आले उत्पादक चिंतेत



**पुणे :** चाकण बाजारपेठेत मोठी मागणी आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीला बाजारभाव घसरल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. वाहतूक खर्च, उत्पादन खर्च ही शेतकऱ्यांचा भागत नाही असे आले उत्पादक शेतकऱ्यांनी सांगितले. चाकण बाजारपेठेत सध्या आवक वाढली आहे. चाकण हे औद्योगिक तसेच व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र असल्याने येथे राज्यातील विविध भागांतून तसेच नवी मुंबई, पनवेल, खोपोली , पिंपरी चिंचवड,अहिल्यानगर भागातून खरेदीदार येतात. किरकोळ विक्रेते तसेच प्रक्रिया उद्योगांकडून आल्याची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली जाते. आल्यास विशेषतः मसाला उत्पादन आणि हॉटेल व्यवसायासाठी साताऱ्याचे आले पसंतीस उतरते. उन्हाळ्याच्या तडाख्यामुळे तसेच बाजारातील वाढत्या आवकेमुळे आल्याचे आल्याचे बाजारभाव घसरले आहेत. काही आठवड्यांपूर्वी प्रतिक्विंटलला मिळणारा भाव समाधानकारक होता; परंतु सध्या तो लक्षणीयरीत्या कमी झाला आहे.अनेक शेतकऱ्यांनी अपेक्षित भाव न मिळाल्याची खंत व्यक्त केली आहे. उन्हाळ्यात आल्याची साठवण क्षमता कमी होते. उष्णतेमुळे माल खराब होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे बाजारात आले लवकर विक्रीस काढले जाते. परिणामी पुरवठा वाढून दर घसरतात. निर्यातीत घट व स्थानिक मागणीतील चढ-उतार याचाही परिणाम भावावर होत आहे असे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

## श्री नागेश विद्यालयाचा 'एनएमएमएस' परीक्षेत डंका; ९६ पैकी ८० विद्यार्थी उत्तीर्ण



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** रयत शिक्षण संस्था संचलित श्री नागेश विद्यालय, जामखेड येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा (सन २०२५२६) मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. परीक्षेस बसलेल्या ९६ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा एकूण निकाल ८३.३३ टक्के लागला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही कामगिरी प्रेरणादायी ठरली आहे.

विद्यालयातील आयुष अविनाश बोधले व संचित संतोष खैरे या दोन्ही विद्यार्थ्यांनी प्रत्येकी १४९ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. द्वितीय क्रमांक भोंडवे यश महादेव (१४७ गुण), तृतीय क्रमांक वराट यशराज शहादेव (१४५ गुण) तर चौथा क्रमांक भवर यशराज शंकर (१४४ गुण) यांनी मिळविला. तसेच जाधव ओम, वटाणे ओंकार, माळी कृष्णा, धुमाळ सोहम, पवार अथर्व, तिवारी करण, जगताप अनिश आणि रेळेकर श्रेयश यांसह १३ विद्यार्थ्यांनी १२० पेक्षा अधिक गुण मिळवून विशेष प्राविण्य संपादन केले. एकूण ३३ विद्यार्थ्यांनी १०० हून अधिक गुण मिळवले आहेत.

या यशामागे शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. बुद्धिमत्ता विभाग प्रमुख देशमुख एस.एस., विज्ञान विषयाचे मडके बी.के. व पठाण ए.एन., सामाजिक शास्त्राचे लटपटे डी.व्ही. तसेच गणित विषयाचे चौधरे ए.बी. यांनी विद्यार्थ्यांना परिश्रमपूर्वक मार्गदर्शन केले.मुख्याध्यापक मडके बी.के., पर्यवेक्षक जाधवर एस.व्ही., स्थानिक स्कूल कमिटी सदस्य राजेंद्र कोठारी, हरिभाऊ बेलेकर, विनायक राऊत तसेच शाळा व्यवस्थापन समितीने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. जामखेड परिसरातून यशस्वी विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## उपासमारीमुळे निपचित पडलेल्या मादी बिबट्याला वाचविले!



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** कल्याण महामार्गालगत असलेल्या खामुंडी (ता. जुन्नर) येथील बदगी-बेलापूर रस्त्यालगत आज पहाटे जखमी अवस्थेत बिबट मादी आढळल्याची घटना घडली. सकाळी अंदाजे ६:४५ वाजण्याच्या सुमारास सुभाष भिमाजी बोडके यांच्या मालकीच्या गट क्रमांक ८० मधील शेतजमिनीत ही सुमारे दोन वर्षे वयाची बिबट मादी पडलेल्या अवस्थेत दिसून आली.

घटनेची माहिती मिळताच वनरक्षक, ओतूर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. त्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे, यांना भ्रमणध्वनीद्वारे कळविण्यात आले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल सारिका बुट्टे, वनरक्षक विश्वनाथ बेले तसेच आळे व नगदवाडी येथील रेस्क्यू पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. यावेळी माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथील पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारीही घटनास्थळी पोहोचले. तज्ज्ञ डॉक्टरांनी बिबट मादीची पाहणी करून तिला बेशुद्ध करण्याची प्रक्रिया पार पाडली. त्यानंतर सुरक्षितरीत्या ताब्यात घेऊन पुढील उपचारासाठी माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात हलविण्यात आले आहे. दरम्यान माणिकडोह बिबट्या निवारण केंद्रातील डॉक्टरांनी माहिती देताना सांगितले की, या मादीला अनेक दिवस भक्ष मिळाले नाही व त्यामुळे तिला अशक्तपणा येऊन ती एका जागेवर निपचित पडली. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. वन विभागाने नागरिकांना अफवा पसरवू नयेत तसेच वन्य प्राण्यांच्या हालचाली दिसल्यास त्वरित वन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## मुलाच्या लग्नाचा मुहूर्तावर 'कुसुमाग्रज ग्रंथालय' थाटलं

### माजी विद्यार्थ्याचा 'आदर्श'वत उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील शेवगाव तालुका येथील गदेवाडी गावचे भूमिपुत्र तसेच गदेवाडी विविध कार्यकारी सेवा संस्थाचे माजी चेअरमन रामनाथ लेंडाळ यांनी आपल्या मुलाच्या विवाहप्रसंगी समाजाला दिशा देणारा आदर्श उपक्रम राबविला आहे.

सध्या विवाह समारंभांमध्ये अनावश्यक खर्च, दिखावा आणि स्पर्धात्मक खर्च वाढत असताना लेंडाळ यांनी हा खर्च टाळून तो शिक्षणासाठी वळविण्याचा निर्णय घेतला आहे. रामनाथ लेंडाळ यांनी आपल्या बालपणी ज्या शाळेत शिक्षण घेतले, त्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गदेवाडी शाळेच्या गुणवत्तापूर्ण कार्याची दखल घेत शाळेच्या शैक्षणिक विकासासाठी पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती वाढावी, ज्ञानाची गोडी लागावी आणि स्पर्धात्मक युगात ग्रामीण विद्यार्थ्यांनाही दर्जेदार सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने शाळेत सुसज्ज 'कुसुमाग्रज ग्रंथालय' उभारण्यासाठी त्यांनी २१ हजार रुपयांची रोख रक्कम धनादेशाद्वारे देणगी स्वरूपात दिली.

शाळेचे मुख्याध्यापक गुंजाळ यांच्यासह शिक्षक अशोक मडके, ढोले गुरुजी आणि बापू आरले यांच्याकडे औपचारिकरित्या हा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी शाळेतील शिक्षकवर्ग, ग्रामस्थ तसेच मान्यवर उपस्थित होते. बोधेगाव बीटचे विस्तार अधिकारी डॉ. शंकर गाडेकर आणि गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ यांनीही या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक करत इतर नागरिकांनीही अशा प्रकारचे उपक्रम राबवावेत, असे आवाहन केले आहे.



# 'बाळूमामाच्या नावानं चांगभलं'च्या जयघोषात बोल्हेगाव दुमदुमले

## आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते महाआरती



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** संत बाळूमामांचे कार्य हे समाजाला योग्य दिशा देणारा दीपस्तंभ असून, त्यांच्या विचारांनी समाजात श्रद्धा, एकता आणि प्रेमाची भावना जागृत केली आहे. या भक्तीमय सोहळ्यामुळे मनाला अपार आनंद आणि समाधान लाभले, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

बोल्हेगाव येथील वाकळे मळा परिसरात आयोजित संत बाळूमामा पालखी सोहळ्याप्रसंगी आमदार जगताप बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते पालखीची विधीवत महाआरती करण्यात आली.

पालखी सोहळ्यानिमित्त आयोजित कीर्तन, हरिनाम आणि महाआरतीच्या कार्यक्रमाने संपूर्ण बोल्हेगाव परिसर भक्तीमय झाला होता. टाळ-मृदुंगाचा निनाद आणि 'बाळूमामाच्या नावानं चांगभलं' या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले होते. या सोहळ्याचे स्वरूप इतके भव्य होते की, वाकळे मळा परिसराला जणू पंढरपूरचे स्वरूप प्राप्त झाले होते.

याप्रसंगी आमदार जगताप यांनी माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांच्या कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले की, वाकळे यांनी विकासाच्या योजनांसोबतच अध्यात्मिकतेचा वारसाही तितक्याच ताकदीने जोपासला आहे. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणणारे त्यांचे हे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

या सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, अशोक महाराज पालवे, नगरसेवक बाबूशेठ नागरगोजे, आकाश कातोरे, नितीन शेळके, पंकज वाकळे यांसह परिसरातील हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नेटके आयोजन माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कीर्तन सोहळ्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला विज्ञानाची जोड आवश्यक : डॉ.पंढरीनाथ गोरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मिरजगाव :** विद्यार्थ्यांनी विज्ञानाकडे विषय म्हणून नव्हे तर जीवनपद्धती म्हणून पाहावे. अंधश्रद्धा, गैरसमज आणि चुकीच्या समजुती दूर करण्यासाठी विज्ञानाचा आधार आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण झाला पाहिजे, असे प्रतिपादन कर्जत तालुका सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष डॉ.पंढरीनाथ गोरे यांनी केले.

कर्जत तालुक्यातील मिरजगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत डॉ. सी.व्ही.रमण यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून शाळेत शालेय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उदघाटन कर्जत तालुका सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष डॉ.पंढरीनाथ गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी भारताचे वैज्ञानिक डॉ.सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी मिरजगाव केंद्राचे केंद्रप्रमुख त्र्यंबके सर, शालेय मुख्याध्यापक डहाळे सर, शेख मॅडम, शालेय समिती मुली विभाग समितीचे अध्यक्ष राहुल कोल्हे, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते शिवाजीराव नवले, उपसरपंच लहू वतारे, तसेच मुले विभागाचे मुख्याध्यापक काळ, दीपक कारंजकर, शेख, बचाटे व शिक्षक वृंद उपस्थित होते.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विज्ञानातील सौर ऊर्जा, पाण्याचे शुद्धीकरण, रहदारीचे नियम, अन्न संरक्षण, वायू व ध्वनी प्रदुषण, जलप्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना यांसारख्या अनेक प्रयोगांची मांडणी केली होती.

या प्रदर्शनास पालक व माता भगिनी, स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

प्रदर्शनाच्या शेवटी उत्कृष्ट प्रकल्प सादर करणाऱ्या बालवैज्ञानिकांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

# सौरऊर्जा प्रकल्पाच्या खर्चात १५ हजारांची कपात; ग्राहकांना मोठा दिलासा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि दारिद्र्यरेषेखालील घरगुती वीज ग्राहकांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'स्मार्ट' योजनेबाबत महावितरणने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने सुरू केलेल्या या योजनेसाठी महावितरणने काढलेल्या निविदेत (टेंडर), छतावरील सौरऊर्जा प्रकल्पाची (Rooftop Solar) प्रति किलोवॅट किंमत आता ४५,४५० रुपये निश्चित करण्यात आली आहे.

सध्या बाजारपेठेत सौरऊर्जा पुरवठादार प्रति किलोवॅट सुमारे ६० हजार रुपये आकारत आहेत. मात्र, महावितरणने निश्चित केलेल्या नवीन दरामुळे ग्राहकांची थेट १५ हजार रुपयांची बचत होणार आहे. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत या दरांना मान्यता देण्यात आली. यावेळी राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला उपस्थित होत्या.

राज्य सरकारने 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलार' (स्मार्ट) योजनेअंतर्गत ५ लाख छोट्या ग्राहकांना मोफत वीज देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ज्या ग्राहकांचा वापर महिना १०० युनिटपर्यंत आहे, अशांना या योजनेचा लाभ मिळेल. केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने'च्या अनुदानासोबतच राज्य सरकारही अतिरिक्त अनुदान देऊन या ग्राहकांवरील आर्थिक भार कमी करणार आहे.



एक किलोवॅटच्या सौर प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. यामुळे ग्राहकांचे वीजबिल शून्य तर होईलच, पण जास्तीची वीज महावितरणला विकून ग्राहकांना उत्पन्नही मिळवता येईल. महावितरणने या प्रकल्पासाठी अधिकृत पुरवठादारांची यादी आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. या निर्णयामुळे केवळ ५ लाख लाभार्थीच नव्हे, तर आगामी काळात सौर प्रकल्प बसवू इच्छिणाऱ्या इतर सर्व सामान्य ग्राहकांनाही कमी दराचा फायदा मिळणार आहे.

### महत्त्वाचे मुद्दे :

* किंमतीत घट : सौर प्रकल्पाचा खर्च ६०,००० रुपयांवरून ४५,४५० रुपयांवर आला.
* थेट बचत : प्रति किलोवॅट १५,००० रुपयांचा आर्थिक फायदा.
* लाभार्थी : राज्यातील ५ लाख आर्थिकदृष्ट्या दुर्बल वीज ग्राहक.
* शन्य वीजबिल : दरमहा १२० युनिट वीज निर्मितीमुळे वीजबिलातून सुटका.
* केंद्रीय अनुदान : १ किलोवॅटसाठी ३०,००० रुपये, तर ३ किलोवॅटसाठी ७८,००० रुपये अनुदान.
* अंमलबजावणी : महावितरणमार्फत पुरवठादारांची यादी पोर्टलवर उपलब्ध.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

सोमवार, दि.०२ मार्च २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## राजळे महाविद्यालयाचे प्रा. टेमकर यांना पुणे विभागीय उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार



**करंजी :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सभागृह येथे २५ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात आदिनाथनगर येथील दादापाटील राजळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांना पुणे विभागीय उत्कृष्ट प्राचार्य म्हणून सन्मानित करण्यात आले. प्रभावी नेतृत्व, शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांची अंमलबजावणी आणि करिअर कट्टा उपक्रमातील सक्रिय सहभाग याबद्दल त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. मा. डॉ. नामदेव भोसले, सहसचिव (मराठी भाषा विभाग), मा. रुपेंद्र मोरे, संचालक (शासकीय मुद्रण व स्थिर प्रकाशन संचालनालय) आणि करिअर कट्टाचे अध्यक्ष मा. यशवंत शितोळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. या प्रसंगी सचिन इटकर, सोनाली लोहार, मंदार फणसे, मिथिला दळवी व डिंपल मित्तल आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. टेमकर यांनी सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत संस्थेचे अध्यक्ष मा.आ. आप्पासाहेब राजळे (काका) व आमदार मोनिकाताई राजीव राजळे यांच्या मार्गदर्शनामुळे महाविद्यालयात गुणवत्ता व विद्यार्थी-केंद्रित उपक्रम राबविता आल्याचे सांगितले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळेच हे यश शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.

## अतिक्रमणांना अखेर लगाम!

# मढीत देवस्थान समिती पोलिसांची संयुक्त धडक मोहीम





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** यात्रेच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सोयीसाठी प्रशासनाने कठोर पावले उचलत मढी देवस्थान समिती आणि पाथर्डी पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील मढी येथे अतिक्रमण हटावाची व्यापक मोहीम राबविण्यात आली. यात्रेपूर्वी झालेल्या या निर्णायक कारवाईमुळे मंदिर परिसरातील मुख्य रस्ते मोकळे झाले असून भाविक आणि ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. प्रशासनाची ठाम भूमिका पाहून अनेक अतिक्रमणधारकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेतल्याचे चित्र दिसून आले. मढी येथे असलेल्या चैतन्य कानिफनाथ संजीवन समाधीमुळे होळीपासून गुढीपाडव्यापर्यंत येथे मोठी यात्रा भरते. राज्यभरातील भटक्या समाजाची पंढरी म्हणून ओळख असलेल्या या यात्रेत दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. पौर्णिमा, गुरुवार आणि अमावस्येला देखील मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने मंदिर परिसरातील रस्त्यांवर प्रचंड ताण निर्माण होत होता. भक्तनिवास आणि मंदिर प्रवेश मार्ग व्यापाऱ्यांच्या अतिक्रमणामुळे अरुंद झाले होते, त्यामुळे भाविकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत होता. देवस्थान समितीकडून वारंवार सूचना देऊनही अतिक्रमणे हटवली जात नसल्याने अखेर पोलिसांच्या बंदोबस्तात धडक कारवाई करण्यात आली. सुमारे ७५ पोलीस कर्मचारी, दोन अधिकारी आणि पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या नेतृत्वाखाली मोहीम पार पडली. समितीकडून दोन जेसीबी, चार ट्रॅक्टर आणि मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आल्याने कारवाई वेगाने पूर्ण झाली. अंदाजे दीडशे व्यावसायिकांनी आपली अतिक्रमणे हटवली असून श्रीराम चौक ते भक्तनिवास कोपरा आणि तेथून उत्तर दरवाजापर्यंतचा मार्ग पूर्णपणे खुला झाला आहे. गर्दीच्या वेळी सर्वाधिक वाहतूक कोंडी आणि किरकोळ गुन्हेगारी घडणारा हा परिसर असल्याने भाविकांनी दिलासा व्यक्त केला.याबाबत बोलताना पोलीस निरीक्षक विलास पुजारी म्हणाले, यात्रा काळात भाविकांच्या मार्गात अडथळा निर्माण करणारे कोणतेही अतिक्रमण सहन केले जाणार नाही.

### यात्रेतील दीर्घकाळची समस्या दूर झाल्याची भावना

देवस्थान समितीचे अध्यक्ष विठ्ठल मरकड, कोषाध्यक्ष दादासाहेब मरकड, सचिव माधुरी मरकड, विश्वस्त उत्तम मरकड तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पवार यांनी प्रशासनाला सहकार्य करत ठाम भूमिका घेतली. अतिक्रमणे हटवू नयेत यासाठी काही स्तरावर दबाव आणण्याचे प्रयत्न झाले, मात्र प्रशासनाने कोणालाही न जुमानता कारवाई पूर्ण केल्याने यात्रेतील दीर्घकाळची समस्या दूर झाल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली.

## संत सदगुरु गोदड महाराज देवस्थान ट्रस्ट कायदेशीरच : प्रवीण घुले



**कर्जत :** ज्यांना गोदड महाराजांच्या मंदिरात चुकीचे आणि नियमबाह्य काम करायचे आहे त्यांना आम्ही नको आहे. मागील दोन-तीन वर्षांपासून आम्ही अन्नछत्र चालू केले आहे ते नियमित आणि पारदर्शकपणे सुरू असून त्याचा लेखाजोखा कायम कर्जतकरांसाठी खुला ठेवला आहे. गोदड महाराजांची सेवा अठरा-पगड जाती करीत असून या ट्रस्टमध्ये २७ जातींचे पदाधिकारी काम करणार आहे. महाराज कोणा एका कुटुंबाचे नसून ते समस्त जनतेचे आहेत. त्यामुळे काल ज्यांना पोटशूळ उठला होता त्यांनी आपला कारभाराचे एकदा आत्मचिंतन करावे असा आरोप प्रवीण घुले यांनी पत्रकार परिषदेत केला.

### कर्जतकरांना वेठीस धरण्याचा प्रकार

शनिवारी अनधिकृत ट्रस्ट स्थापन करण्याच्या नावाने कर्जत बंद ठेवत कर्जतकर जनतेस नाहक वेठीस धरण्याचा प्रकार करण्यात आला. तसेच मंदिरासमोर राजकीय वळण देत जो काही प्रकार झाला तो चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आला. ही जागा भक्ती करण्याची असून या ठिकाणी कोणाचेच राजकारण सदगुरु गोदड महाराज कधीच चालू देत नाही. ट्रस्ट धर्मादाय आयुक्त यांच्या नियमाला धरूनच करण्यात आला असल्याचा पुनरोच्चार पत्रकार परिषदेत प्रदीप पाटील यांनी केला.

## शिर्डी पोलीस ठाण्यातील 'त्या' वादाचे प्रकरण....

# तीन महिला आरोपींना उच्च न्यायालयाकडून जामीन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहाता :** शिर्डी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यातील तीन महिला आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने नियमित जामीन मंजूर केला आहे. गेल्या काही दिवसांपासून कोठडीत असलेल्या या महिलांना न्यायालयाच्या या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला असून, कौटुंबिक आणि मानवी दृष्टिकोनातून हा निकाल महत्त्वाचा मानला जात आहे.

शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १०४९/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १३२, १२१(१) व ३(५) अंतर्गत हा गुन्हा नोंदवण्यात आला होता. फिर्यादीनुसार, शिर्डी पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांशी झालेल्या वादातून या महिलांनी शिवीगाळ व धक्काबुक्की केल्याचा आरोप करण्यात आला होता. या आरोपावरून त्यांना अटक करून न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले होते.या प्रकरणात आरोपींच्या वतीने ॲड. महेश कृष्णा साना आणि ॲड. अमोल अजय पवार यांनी न्यायालयात बाजू मांडली. त्यांनी आपल्या युक्तिवादात अनेक महत्वाचे मुद्दे मांडले. महिलांवरील आरोप हे सर्वसाधारण आणि अस्पष्ट स्वरूपाचे असून ते बनावट आहेत. हा प्रकार पूर्वनियोजित नसून क्षणिक वादातून घडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. संबंधित महिलांचा कोणताही गुन्हेगारी पूर्वइतिहास नाही, असे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. सर्व कायदेशीर आणि मानवी बाबींचा सखोल विचार करून उच्च न्यायालयाने या महिलांचा जामीन अर्ज मंजूर केला. या निर्णयामुळे शिर्डी परिसरातील संबंधित कुटुंबांना दिलासा मिळाला असून, सामान्य नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

### मानवतावादी दृष्टिकोन आणि न्यायालयाचे निरीक्षण

उच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर नमूद केले की, आरोपी ३१ डिसेंबर २०२५ पासून कोठडीत आहेत आणि आता त्यांच्याकडून कोणतीही जप्ती शिल्लक नाही. विशेष म्हणजे, आरोपींपैकी एक महिला गर्भवती असून इतरांना लहान मुले आहेत, ही मानवी बाब न्यायालयाने प्रामुख्याने विचारात घेतली.

# प्रशासनाचे दुर्लक्ष! दाढ खुर्द-खळी रस्त्याची चाळण

## संतप्त ग्रामस्थांचा मतदानावर बहिष्काराचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील पूर्व भागातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या दाढ खुर्द आणि खळी गावाला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली आहे. भांडवस्ती ते दगडी पूल आणि दाढ फाटा ते चनेगाव या मार्गावर गेल्या अनेक महिन्यांपासून मोठमोठे खड्डे पडले असून, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ग्रामस्थांनी आता थेट आगामी सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा आक्रमक पवित्रा घेतला आहे.

या मार्गावरून चारचाकीसह सहा, आठ आणि दहा चाकी अवजड वाहनांची मोठी वर्दळ असते. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे परिसरात धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून रस्त्यालगत राहणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच, खड्ड्यांमुळे येथे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. शाळेत जाणाऱ्या लहान मुला-मुलींच्या सायकली व दुचाकी घसरून अनेकदा अपघात झाले असून, विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे.



ग्रामस्थांनी रस्ता डांबरीकरणासाठी अनेक वेळा लोकप्रतिनिधी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदने दिली. ग्रामसभा आणि ग्रामपंचायतीच्या माध्यमातूनही वारंवार मागणी करूनही प्रशासनाने याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

आगामी महिनाभरात लोकप्रतिनिधींनी वैयक्तिक लक्ष घालून या रस्त्याचे काम सुरू करावे, अशी आर्त हाक शाळकरी विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी दिली आहे.

### ग्रामस्थांचा अल्टिमेटम

संतापलेल्या ग्रामस्थांनी प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. १५ दिवसांत रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावेत. पुढील २ महिने रस्ता डांबरीकरणाबाबत प्रशासनाने लेखी आश्वासन द्यावे. जर ठोस पावले उचलली नाहीत, तर भविष्यात होणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये मतदानावर बहिष्कार टाकला जाईल. येथून पुढे कोणत्याही लोकप्रतिनिधी किंवा पुढाऱ्याने आमच्याकडे मत मागायला येऊ नये, आल्यास त्यांना तीव्र विरोधाचा सामना करावा लागेल, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतर गुटखा तस्करांची जीप पकडली!

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** पोलीस अधीक्षकांच्या 'रडार'वर असलेल्या गुटखा तस्करांविरुद्ध श्रीगोंदा पोलिसांनी मध्यरात्री मोठी कारवाई केली आहे. वडळी रोडवरील लोखंडेवस्ती परिसरात सापळा रचून पोलिसांनी ७ लाख १५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे, सुरुवातीला संशयास्पद वाहन सोडून देण्याच्या प्रयत्नानंतर वरिष्ठ कार्यालयाने झापल्यामुळे ही कारवाई झाल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका चारचाकी वाहनातून (छोटा हत्ती/टाटा सुमो) बेकायदेशीर गुटख्याची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती अहिल्यानगर पोलीस अधीक्षक कार्यालयाला मिळाली होती. ही माहिती श्रीगोंदा पोलिसांना कळवण्यात आली. सुरुवातीला हे वाहन पकडल्यानंतर गाडीत गुटखा नसून टायर आहेत असे सांगून वाहन सोडून देण्यात आल्याची चर्चा होती. मात्र, ही बाब वरिष्ठ कार्यालयाच्या लक्षात येताच पोलीस अधीक्षकांनी डीवायएसपी कार्यालयाची चांगलीच हजेरी घेतली आणि कारवाईचे आदेश दिले. त्यानंतर, २७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ११:३० च्या सुमारास टाटा सुमो गोल्ड (क्र. MH 15 DM 8425) हे संशयास्पद वाहन अडवण्यात आले. झडती घेतली असता, त्यात राज्यात प्रतिबंधित असलेला मोठ्या प्रमाणात पानमसाला आणि तंबाखू मिळून आली. प्रकरणी २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ३:५५ वाजता श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७२, २७४, २७५ अन्वये हा गुन्हा नोंदवण्यात आला असून, वाहनाचा चालक आणि मालक यांचा शोध पोलीस घेत आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ ए. बी. तरटे करत आहेत.

### जप्त केलेला मुद्देमाल

- **जी-१ कंपनी तंबाखू: १५०० पुडे (किंमत ४५,००० रुपये)**
- **गोवा-१००० पानमसाला: १३५० पुडे (किंमत २,७०,००० रुपये)**
- **टाटा सुमो गोल्ड: (अंदाजे किंमत ४,००,००० रुपये)**
- **एकूण किंमत: ७,१५,००० रुपये**

# १७ मार्चला शेती महामंडळ कामगारांचा पुण्यावर धडक मोर्चा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव :** महाराष्ट्र सरकारने एमआयडीसी आणि ग्राम पंचायतींना शेती महामंडळाची हजारो एकर जमीन विनामूल्य दिली, मात्र कामगारांना हक्काची घरे देण्याबाबत उच्च न्यायालयाचे आदेश असूनही प्रशासन टाळाटाळ करत आहे. या अन्यायाविरुद्ध आणि विविध प्रलंबित मागण्यांसाठी येत्या १७ मार्च रोजी शेती महामंडळाच्या पुणे येथील मुख्यालयावर राज्यातील १४ मळ्यांवरील कामगारांचा विराट मोर्चा काढण्यात येणार आहे.

श्रीरामपूर येथे आयोजित कामगार मेळाव्यात बोलताना कामगार नेते सुभाष कुलकर्णी यांनी हा इशारा दिला. ते म्हणाले की, रामराजे निंबाळकर कमिटीच्या शिफारशीनुसार कामगारांना दोन गुंठे जागा देऊन प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे बांधून द्यावीत. तसेच चौथा, पाचवा आणि सहाव्या वेतन आयोगाचा फरक तातडीने मिळावा.

या मेळाव्यात अविनाश आपटे, बाळासाहेब बोर्डे, अशोक पाटील यांच्यासह अनेक नेत्यांची भाषणे झाली. अध्यक्षीय भाषणात उत्तम राजगुडे यांनी कामगारांच्या संघर्षाचा पाढा वाचला. कष्टकऱ्यांच्या रोजीरोटीचा आणि निवाऱ्याचा प्रश्न मिटल्याशिवाय हे आंदोलन मागे घेतले जाणार नाही, प्रसंगी आमरण उपोषण करू, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. जे कामगार या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतील, त्यांनाच सवलतींचा फायदा मिळेल, असेही कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

### प्रमुख मागण्या :

- समान कामासाठी समान वेतन लागू करावे.
- २०१८ च्या औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयानुसार रोजंदार कामगारांना १५ दिवसांची नुकसान भरपाई व ३ महिन्यांचा ज्यादा पगार द्यावा.
- सेवानिवृत्त कामगारांना न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे ग्रॅच्युइटीची रक्कम मिळावी.
- थकीत देणी त्वरित अदा करावीत.



# श्रीकृष्ण चरित्राचा उच्चार करावा, आचार करू नये

## अरूणनाथगिरी महाराज यांचे विरगाव येथे प्रतिपादन





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** अनेक भक्तांना श्रीकृष्ण चरित्र पूर्णतः समजलेले नाही. गोकुळातील श्रीकृष्ण चरित्राचा केवळ उच्चार करावा, त्याचा आचार करू नये, असा मोलाचा उपदेश श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थानचे मठाधिपती स्वामी अरूणनाथगिरी महाराज यांनी केला. वैजापूर तालुक्यातील विरगाव येथे आयोजित 'संगीत नवनाथ कथा' सोहळ्याच्या सांगता प्रसंगी ते बोलत होते.

'ओम चैतन्य कानिफनाथ भक्त मंडळ' व समस्त ग्रामस्थांच्या वतीने दि. २१ ते २७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सात दिवस विरगावसह पंचक्रोशीतील भाविकांनी स्वामींच्या सुश्राव्य वाणीतून नवनाथ कथेचे श्रवण केले. रविवारी, दि. २८ रोजी काल्याच्या कीर्तनाने या सोहळ्याची सांगता झाली.

काल्याच्या कीर्तनात 'कृष्ण गोकुळी जन्मला...' या अभंगाद्वारे निरूपण करताना महाराज म्हणाले की, भगवान श्रीकृष्णाचे चरित्र गोकुळ, मथुरा आणि द्वारका अशा तीन भागात विभागलेले आहे. मथुरेतील आणि द्वारकेतील चरित्राचा केवळ उच्चार करावा, कारण ते योगेश्वराचे चरित्र आहे. सद्गुरू नारायणगिरी महाराज नेहमी म्हणायचे की, श्रीकृष्ण चरित्रातील 'गौळणी' अजूनही अनेकांना नीट समजलेल्या नाहीत. यावेळी महाराजांनी सराला बेटाचा महिमा आणि सद्गुरू गंगागिरी महाराज व नारायणगिरी महाराज यांच्या आठवणींनाही उजाळा दिला.

या सोहळ्याला कैलास महाराज दुशिंग, राहुल महाराज चेचरे, लखनगिरी महाराज यांच्यासह अनेक वादकांनी साथ दिली. भजनी मंडळ आणि देणगीदारांच्या सहकार्याने हा सोहळा यशस्वी झाला. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी सर्व भाविकांचे आभार मानले.